❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती **सोमवार, दि. ०५ ऑक्टोबर २०२६** ❖ पाने : ८ ❖ अंक : २८० ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या** निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक




# मराठी ही केवळ संवादाची भाषा नव्हे, तर संस्कृती-इतिहासाची साक्षीदार

## डिजिटल युगात मराठीला ज्ञानभाषा करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ मुंबई (दै. संध्या)

मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती आपल्या समृद्ध संस्कृतीची वाहक आणि जाज्वल्य इतिहासाची साक्षीदार आहे. विपुल शब्दसंपदा, समृद्ध साहित्यपरंपरा आणि विविध बोलीभाषांचा वारसा लाभलेल्या मराठीला २१व्या शतकात डिजिटल आणि ज्ञानभाषा म्हणून अधिक सक्षम करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मराठीचा दैनंदिन व्यवहारातील वापर वाढविण्यासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डिजिटल तंत्रज्ञान, क्वांटम कॉम्प्युटिंग, स्पेस टेक्नॉलॉजी आणि बायोटेक्नॉलॉजीसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही मराठीचा वापर वाढविण्याचे आवाहन त्यांनी केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' आणि 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस' कार्यक्रमाचा चर्चगेट येथील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकर्सी महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात उत्साहात शुभारंभ झाला. यावेळी आयोजित विशेष सोहळ्यात फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, मुंबईच्या महापौर रितू तावडे, विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. हेमलता बागला, मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांच्यासह मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि मराठीप्रेमी उपस्थित होते.




मराठी भाषा प्राचीन आणि अभिजात आहेच; मात्र तिला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेची अधिकृत मान्यता मिळणे हा मराठी भाषकांसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या भाषिक आणि सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय पातळीवर विशेष अधोरेखित स्थान मिळाले असल्याचे त्यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या संकल्पनेसोबत स्वभाषेलाही महत्त्व दिले. राज्यकारभारात मराठीचा वापर वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि त्यातून मराठीच्या प्रशासकीय वापराला नवी दिशा मिळाली, अशी आठवणही फडणवीस यांनी यावेळी करून दिली. जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठीचा १३वा क्रमांक असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मराठी ही जागतिक स्वरूपाची भाषा आहे. विसाव्या शतकात तयार झालेल्या मराठी ज्ञानकोश आणि शब्दरत्नाकरामध्ये ११ ते १३ लाख शब्द असल्याचा उल्लेख त्यांनी केला. तुलनेत ऑक्सफर्ड शब्दकोशात सुमारे सहा लाख शब्द, तर मँडरिन, स्पॅनिश आणि फ्रेंचसारख्या भाषांमध्ये साधारण तीन ते साडेतीन लाख शब्द असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाच्या प्रकाशित मराठी शब्दकोशात सध्या सुमारे तीन लाख शब्द आहेत. त्याच्या पुढील आवृत्त्या तयार करून शब्दसंपदा १३ लाख शब्दांपर्यंत नेण्याचे काम करण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केली. मराठीच्या समृद्ध शब्दसंपदेचा उल्लेख करताना फडणवीस यांनी मराठी ज्ञानकोश आणि शब्दकोशांच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. विविध कोशांमध्ये लाखो मराठी शब्द नोंदविले गेले असून, ही शब्दसंपदा मराठीच्या समृद्ध भाषिक परंपरेचे दर्शन घडवते, असे त्यांनी सांगितले. मराठीचा हा शब्दवैभव केवळ अभिमानाचा विषय न राहता आधुनिक ज्ञाननिर्मितीमध्येही त्याचा प्रभावी वापर झाला पाहिजे. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, शिक्षण आणि संशोधनाच्या क्षेत्रातील संकल्पना मराठीत उपलब्ध झाल्यास मराठी खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा बनेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

डिजिटल तंत्रज्ञानामुळे संवादाची माध्यमे वेगाने बदलत आहेत. अशा परिस्थितीत मराठीला केवळ पारंपरिक वापरापुरते मर्यादित न ठेवता नव्या तंत्रज्ञानाशी जोडणे आवश्यक आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. 'मराठी AI'च्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात मराठीचा प्रभावी वापर वाढविणे, डिजिटल माध्यमांवर मराठीतील माहिती आणि ज्ञानसामग्री उपलब्ध करून देणे, तसेच ओटीटी प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावर दर्जेदार मराठी कंटेंट मोठ्या प्रमाणात निर्माण करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले. क्वांटम कॉम्प्युटिंग, स्पेस टेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजी यांसारख्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये मराठीतील ज्ञानसामग्री उपलब्ध झाल्यास नव्या पिढीला मातृभाषेतून आधुनिक ज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मराठीचे जतन आणि संवर्धन केवळ शासकीय उपक्रमांपुरते मर्यादित न ठेवता प्रत्येक मराठी भाषिकाने आपल्या दैनंदिन व्यवहारातून त्यासाठी योगदान देणे आवश्यक आहे. घर, शिक्षण, प्रशासन, व्यवसाय, तंत्रज्ञान आणि सामाजिक माध्यमे अशा सर्व क्षेत्रांमध्ये मराठीचा अधिकाधिक वापर वाढला पाहिजे. परंपरेचा अभिमान आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालत मराठीला भविष्यातील सक्षम ज्ञानभाषा बनविणे ही सामूहिक जबाबदारी आहे, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

### बोलीभाषांचा गोडवाही जपला पाहिजे

प्रमाण मराठीसोबतच महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषा हा मराठीचा अमूल्य ठेवा असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. कोकणी, वऱ्हाडी, खानदेशी-अहिराणी, मालवणी, डांगी, झाडीबोली यांसारख्या बोलीभाषांमध्ये स्थानिक संस्कृती, लोकपरंपरा आणि जीवनानुभव सामावलेले आहेत. त्यामुळे या बोलींचे साहित्य, लोकपरंपरा आणि भाषिक वैशिष्ट्ये जतन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. मराठी नाट्यसंस्कृतीचाही त्यांनी विशेष उल्लेख केला. आधुनिक तंत्रज्ञानाची साधने मर्यादित असतानाही अनेक पिढ्यांनी मराठी रंगभूमीची समृद्ध परंपरा जिवंत ठेवली. कलावंतांनी आपल्या अभिनयातून, लेखनातून आणि प्रयोगशीलतेतून मराठी रंगभूमीला वेगळी ओळख मिळवून दिली. ही नाट्यपरंपरा मराठीच्या सांस्कृतिक सामर्थ्याचे वैशिष्ट्य असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.

## थोडक्यात...

### नारायणगडावर पुन्हा लाखोंचा मराठा मेळावा

**छत्रपती संभाजीनगर : दैनिक संध्या**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून आक्रमक भूमिका घेणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांसह निवडणूक आयोगाच्या कारभारावरही त्यांनी गंभीर आरोप केले. दरम्यान, आगामी दसरा मेळाव्याबाबतही जरांगे पाटील यांनी महत्त्वाची घोषणा केली असून, यंदाचा दसरा मेळावा नारायणगड येथे नियोजित पद्धतीने होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. या मेळाव्यासाठी मराठा समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत आंदोलन करण्याची भूमिका जरांगे पाटील यांनी घेतली होती. मात्र, त्यानंतर त्यांनी मुंबईतील आंदोलनातून माघार घेतली होती. आता दसरा मेळाव्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा मोठ्या संख्येने मराठा समाज एकत्र येण्याची शक्यता आहे. दरवर्षीप्रमाणे नारायणगड येथे दसरा मेळावा होणार असल्याचे सांगत जरांगे पाटील यांनी मराठा बांधवांना या मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

### सत्ताधारी आमदाराचाच सरकारला घरचा आहेर

**बुलढाणा : दैनिक संध्या**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षांमधील कथित गैरप्रकार आणि गोंधळाचा मुद्दा पुन्हा एकदा चांगलाच तापला आहे. परीक्षांमध्ये पारदर्शकता राहिलेली नसल्याचा आरोप करत विद्यार्थी आंदोलन करत असताना आता सत्ताधारी पक्षातील आमदारानेच सरकारसमोर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी MPSCच्या संपूर्ण मंडळाची चौकशी करून ते बरखास्त करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भातील पत्र आणि आपल्याकडील पुरावे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. MPSCच्या परीक्षांमध्ये कथित गैरप्रकार होत असल्याच्या आरोपांवरून राज्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. विविध मागण्यांसाठी पुण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असून, या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचीही भेट घेतली. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारने तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी होत असतानाच आता सत्ताधारी आमदार संजय गायकवाड यांनी आयोगाच्या कामकाजावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना संजय गायकवाड यांनी MPSCच्या कामकाजाबाबत अनेक गंभीर आरोप केले. परीक्षांच्या पेपर तपासणीपासून ते भरती प्रक्रियेपर्यंत अनेक ठिकाणी गैरप्रकार होत असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे केवळ एखाद्या व्यक्तीचा राजीनामा घेण्याऐवजी संपूर्ण आयोगाच्या कामकाजाची चौकशी करून मंडळच बरखास्त करण्याची गरज आहे, असे गायकवाड यांनी म्हटले.

## सेवा संकल्प अभियानाला सायकल रॅलीची जोड

मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग




■ मुंबई (दै. संध्या)

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून जनसेवेसोबतच आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी श्रीमती आंचल गोयल यांच्या निर्देशानुसार, अपर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आणि निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. शिवनंदा लंगडापुरे यांच्या नियोजनातून ही रॅली उत्साहात पार पडली. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत आयोजित या सायकल रॅलीमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून 'निरोगी जीवनशैली, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक सहभाग' याचा संदेश दिला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातून निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. शिवनंदा लंगडापुरे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात झाली. जिल्हाधिकारी कार्यालयातून निघालेली रॅली गेटवे ऑफ इंडिया मार्गे एनसीपीए, मरीन ड्राईव्ह येथे पोहोचून उत्साहात संपन्न झाली. या रॅलीमध्ये निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. शिवनंदा लंगडापुरे, तहसीलदार डॉ. मानसी मार्लेवार, माय भारतचे उपसंचालक अनुप इंगवले, नायब तहसीलदार प्रभाकर नाईक यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून शासकीय सेवा अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच सामाजिक उपक्रमांमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

## ठाकरे बंधूंच्या 'गर्जना मोर्चा'ला परवानगीच नव्हती

**पोलिसांकडून गुन्हे दाखल करण्याची तयारी, आयोजकांच्या अंगलट येण्याची शक्यता**

■ मुंबई (दै. संध्या)

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात देशभरात वातावरण चांगलेच तापले असून, विरोधी पक्षांकडून त्यांच्यावर गंभीर आरोप करत राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. नुकताच 2 ऑक्टोबर रोजी कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने शिवाजी पार्क, मुंबई येथे विविध राज्यांतील जेन-झी तरुणांच्या सहभागाने मोठा मोर्चा काढण्यात आला होता. त्यानंतर आज शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या वतीने ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी संयुक्त 'गर्जना मोर्चा' काढण्यात आला. या मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटासह इतर अनेक विरोधी पक्षांनीही आपला भक्कम पाठिंबा दर्शवला आहे. दरम्यान, या महामोर्चाबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ठाकरे बंधूंनी काढलेल्या या गर्जना मोर्चाला प्रशासनाकडून परवानगीच देण्यात आलेली नव्हती. मुंबईत केवळ आझाद मैदान वगळता इतर कुठेही मोर्चा काढण्यास परवानगी नसल्याने, आता या मोर्चाच्या आयोजकांवर गुन्हे दाखल करण्याची तयारी पोलिसांनी सुरू केली आहे. बेकायदेशीरपणे जमाव जमवणे या कलमांतर्गत हे गुन्हे दाखल केले जातील, असे पोलिस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



या मोर्चादरम्यान उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोग आणि भाजपवर जोरदार शब्दांत टीका केली. मोर्चामध्ये उसळलेल्या अलोट जनसागराचे आणि पाठिंबा देणाऱ्या सर्व राजकीय पक्षांचे आभार मानत त्यांनी, "हा लढा आपल्या स्वातंत्र्याचा आहे," असे नमूद केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'मेक इन इंडिया'च्या घोषणेचा संदर्भ देत उद्धव ठाकरे म्हणाले की, "या माध्यमातून जर तुम्ही हुकूमशहा बनत असाल, तर ती हुकूमशाही आम्ही गाडून टाकू."

आपल्या भाषणात उद्धव ठाकरे यांनी मतदार याद्यांतील घोळाचा मुद्दा प्रामुख्याने उपस्थित केला. देशभरातून तब्बल 13 कोटी लोकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. या घटनेमुळे निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, मतदारांच्या अधिकारांवर गदा येत असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले.

### नेमणुकीवर आक्षेप

मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेवरही उद्धव ठाकरे यांनी सडकून टीका केली. राष्ट्रपतींची जर निवडणूक होऊ शकते, तर मग निवडणूक आयुक्तांची निवडणूक का होत नाही? असा थेट सवाल उपस्थित करत त्यांनी ज्ञानेश कुमार यांच्या नियुक्ती प्रक्रियेवर आक्षेप नोंदवला. लोकशाही टिकवण्यासाठी ही प्रक्रिया पारदर्शक असणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत त्यांनी यावेळी मांडले.

## भारत जैन महामंडळाचे योगदान उल्लेखनीय

*जैन समाजाने सरकारी योजनांच्या अंमलबजावणीत सहभाग वाढवावा – मंत्री मंगलप्रभात लोढा*

■ मुंबई (दै. संध्या)

भारत जैन महामंडळाच्या १२६ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीचा उल्लेख करून राज्यपालांनी संस्थेने जैन धर्मातील तत्त्वे, आध्यात्मिक मूल्ये, सामाजिक एकता आणि मानवसेवेची भावना पुढे नेण्यासाठी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले. या महत्त्वपूर्ण आयोजनाबद्दल त्यांनी भारत जैन महामंडळाला शुभेच्छा दिल्या. यावेळी कौशल्य विकास व इतर खात्यांचा उल्लेख करताना मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, येथे उपस्थित प्रत्येक व्यक्ती स्वतःमध्ये एक संस्था असून जैन समाजातील अनेक व्यक्ती विविध क्षेत्रांत सेवा कार्य करीत आहेत. मात्र, आता जैन समाजाने एखादा सामाजिक उपक्रम सामूहिकपणे स्वीकारण्याच्या दिशेने पुढे जाण्याची गरज आहे. आयुष्मान भारत योजना, तलाव स्वच्छता किंवा केंद्र व राज्य शासन तसेच महानगरपालिकेच्या एखाद्या योजनेच्या अंमलबजावणीत संपूर्ण जैन समाजाने सहभाग घेतल्यास शासन आणि समाज यांच्यातील समन्वय अधिक दृढ होईल.

दुष्काळाच्या परिस्थितीतही जैन समाजाने सेवाभावाने पुढे यावे, असे आवाहन करून मंत्री लोढा म्हणाले की, अनेक ठिकाणी नागरिकांना पिण्याच्या पाण्याची, शेतीला पाण्याची तसेच पशुधनाला चारा आणि पाण्याची आवश्यकता आहे. भगवान महावीरांच्या अहिंसेचा संदेश मानणाऱ्या समाजाने अशा संकटकाळात शासनासोबत काम करून सेवाभाव पुढे न्यावा.



समाजसेवा, उद्योग आणि जनकल्याणाच्या क्षेत्रातील योगदानाबद्दल जैन समाज रत्न पुरस्काराने राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते आमदार पराग शाह, सुखराज नाहर, कैलाशचंद जैन आणि सुरेश गोयल यांचा सन्मान करण्यात आला. राज्यपालांनी सर्व पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्यातून समाजातील इतरांनाही सेवा आणि सामाजिक उत्तरदायित्वाची प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमास मुंबईच्या महापौर रितू तावडे, आमदार पराग शाह, भारत जैन महामंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ख्यालीलाल तातेड, शिवलाल पोखरणा, जैन मुनी मुनिराज मुक्त निलय विजय, आचार्य साध्वी श्री योगक्षेम प्रभा, राष्ट्रसंत गुरुदेव श्री नम्रमुनी तसेच विविध जैन संप्रदायांचे आचार्य, संत, मुनी आणि साध्वी उपस्थित होते.

भारत जैन महामंडळाचे राष्ट्रीय युवा अध्यक्ष भुपेश कोठारी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## भाजपची उमेदवारांची यादी जाहीर

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या हालचालींना वेग आला असून, सर्वपक्षीय मोर्चेबांधणी तीव्र झाली आहे. काँग्रेसपाठोपाठ आता भारतीय जनता पक्षानेही आपल्या वाट्याला आलेल्या तीन जागांसाठी उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. यामध्ये भाजपने पुणे पदवीधर मतदारसंघात मोठा बदल करत धक्कातंत्र अवलंबले असून, इच्छुकांच्या यादीत आघाडीवर असलेल्या शरद लाड यांच्याऐवजी डॉ. स्मिता योगेश जाधव यांना उमेदवारी जाहीर केली आहे. भाजपच्या केंद्रीय आणि प्रांतिक पातळीवरील घडामोडींनुसार, विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे हायकमांडसोबत चर्चेसाठी शनिवारी (दि. 3) दिल्लीला गेले होते. तिथे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर या तीनही मतदारसंघांतील नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आले आणि रविवारी दुपारी ही यादी अधिकृतपणे जाहीर करण्यात आली.

भाजपचे तीन उमेदवार

पुणे पदवीधर मतदारसंघ- डॉ. स्मिता योगेश जाधव

नागपूर पदवीधर मतदारसंघ- सुधाकर कोहळे

पुणे शिक्षक मतदारसंघ- कौस्तुभ गावडे

पुण्यात धक्कातंत्र

पुणे पदवीधर मतदारसंघातून भाजपच्या वतीने शरद लाड यांचे नाव प्रामुख्याने चर्चेत होते आणि ते बऱ्याच दिवसांपासून तयारीही करत होते; मात्र ऐनवेळी पक्षाने धक्कातंत्र वापरत डॉ. स्मिता योगेश जाधव यांना उमेदवारी जाहीर केली.

# संपादकीय

## इंद्रायणीची आळंदी गहिवरली!

दिवेआगरच्या समुद्राने आळंदीतील आठ स्वप्न हिरावून नेली. विनर्स अकॅडमीतील आठ कोवळ्या विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यातील चार विद्यार्थ्यांवर आळंदीत दोघांवर केळगावात. आणि दोघांवर मातापुर(अहिल्यानगर) व वायगाव (अमरावती ) येथे अश्रूच्या महापुरात अंत्यसंस्कार करण्यात आले.आळंदी शहर शोकसागरात बुडाले कोवळ्या वयातील मुलाचे असे अचानक जाणे पाहून आळंदी व पंचक्रोशी पूर्णपणे निःशब्द झाले होते. दिवेआगरच्या किनाऱ्यावर सहलीचा आनंद क्षणात आक्रोशात बदलला. ही बातमी कळताच नातेवाईकांच्या पायाखालची जमीनच सरकली. सहलीला जाताना मुलांच्या चेहऱ्यावर असलेला आनंद डोळ्यात असलेली उत्सुकता आणि घरी परतण्याची वाट पाहणाऱ्या आई-वडिलांची आतुरता..... या सगळ्यांचा एका क्षणात चुराडा व्हावा.आणि ज्या मुलांच्या हसऱ्या चेहऱ्याने घर सोडले त्यांची निःशब्द पार्थिवे घरी परतावीत यापेक्षा पालकांसाठी मोठा आघात कोणता असू शकतो?...दिवेआगरच्या समुद्रात आठ विद्यार्थ्यांचा बुडून झालेला अनपेक्षित मृत्यू ही केवळ एक दुर्घटना नाही ती आपल्या विद्यार्थी सहलीच्या सुरक्षिततेवर आणि व्यवस्थेच्या संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी शोकांतिका आहे. आळंदीतील खाजगी क्लासच्या सहलीत ४२ विद्यार्थी आणि सहा शिक्षक सहभागी झाले होते. या दुदैवी घटनेत समुद्रात उतरलेल्या आठ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी अंत झाला. . प्राथमिक माहितीनुसार पाण्याची खोली. भरती. आणि समुद्रातील प्रवाहाचा अंदाज चुकल्याने ही दुर्घटना घडली. मात्र अंदाज चुकला..एवढे कारण देऊन या दुर्घटनेची जबाबदारी संपणार नाही. कारण अल्पवयीन विद्यार्थ्यांकडून समुद्राच्या धोक्याचे अचूक आकलन अपेक्षितच कसे करता येईल?... त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी सोबत असलेल्या प्रौढाची. आयोजकांची. आणि संबंधित व्यवस्थेची असते. दिवेआगरची ही घटना महाराष्ट्रासाठी नवीन नाही.यापूर्वीही समुद्राकिनारी. धरणावर. नदीपात्रात. धबधब्यावर. आणि गड किल्ल्यावर सहली दरम्यान अनेकदा विद्यार्थ्यांना जीव गमवा लागलेला आहे. प्रत्येक वेळी दुर्घटना घडते.. शोक व्यक्त केला जातो चौकशीचे आदेश दिले जातात. खबरदारीचे आव्हान केले जाते. आणि काही दिवसांनी सगळे पुन्हा पूर्वपदावर येते. मृताची संख्या लक्षात राहते पण दुर्घटनेनंतर बदललेली सुरक्षा व्यवस्था किती काळ टिकते हाही प्रश्न मात्र कायम अनुत्तरित राहतो. सहली बंद करणे हा यावरील उपाय निश्चितच नाही वर्गाच्या चार भिंती बाहेरचे शिक्षण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक आहे. निसर्गाचा अनुभव.ऐतिहासिक स्थळाची माहिती.सामूहिक जीवनमानाचा अनुभव आणि सहकार्यासोबत शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळालीच पाहिजे. पण सहल म्हणजे केवळ मनोरंजन नाही. ती विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची मोठी सामूहिक जबाबदारी आहे. विशेषतः समुद्र. नदी. धरण. तलाव. किंवा धबधबा असलेल्या ठिकाणी सहलीचे नियोजन करताना केवळ पर्यटन स्थळ म्हणून विचार करून करणे योग्य नाही. त्या ठिकाणाची भौगोलिक परिस्थिती. पाण्याची खोली. भरती- ओहोटी प्रवाह. हवामान स्थानिक प्रशासनाच्या सूचना. आणि आपत्कालीन बचाव व्यवस्था याचा आधीच अभ्यास झाला पाहिजे. विद्यार्थ्यांना समुद्राच्या पाण्यात उतरण्याची परवानगी देताना त्या ठरवून दिलेल्या सुरक्षिततेचे कठोर निकष असलेच पाहिजे. पोहता येते आणि समुद्रात सुरक्षित पोहता येणे या दोन पूर्णपणे वेगवेगळ्या गोष्टी आहेत. समुद्रातील प्रवाहाची ताकद अचानक बदलणारी परिस्थिती व भरतीचा वेग याचा अनुभव नसल्यामुळे विद्यार्थी पाण्यात उतरणे धोकादायक ठरलेले आहे. आठ कुटुंबाचे आयुष्य या घटनेने उध्वस्त झाले आहे.त्यांचे दुःख कोणतीही भरपाईने भरून येणे अशक्य आहे. त्यांच्या घरातील किलबिलाट होत असलेल्या एका खोलीत आता कायमची शांतता असणार आहे.आई-वडिलांच्या डोळ्यासमोर मुलांचे चेहरे आणि त्यांच्या आठवणी असतील म्हणूनच या आठ मृत्यूकडे केवळ "दुर्दैवी घटना" म्हणून पाहाणे ही त्या शोकांतिकेची दुसरी शोकांतिका आहे.सहल संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी घरी परतावे त्यांच्या पालकांनी दारात उभे राहून त्यांचे हसरे चेहरे पाहावे आणि सगळे सुखरूप झाले म्हणून सुटकेचा निःश्वास सोडावा यापेक्षा सहलीच्या यशाचे दुसरे कोणतेही मोजमाप असू शकत नाही. या दुर्घटनेत आणखी एक दुर्लक्षित पैलू आहे. जिवंत राहिलेल्या विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य... त्यांनी आपल्या मित्रांना डोळ्यादेखत गमावलेले आहे. त्यांनी पाहिलेला प्रसंग त्यांच्या मनामध्ये खोल परिणाम करू शकतो. त्यामुळे त्यांना केवळ घरी पाठवणे पुरेसे नाही. त्यांच्यासाठी मानसिक समुपदेशन आणि मानसिक आधाराची व्यवस्था करणे हेही तितकेच आवश्यक आहे. चौकशी केवळ कागदपत्री नको. दुर्घटनेपूर्वी सहलीचे काय नियोजन झाले होते?विद्यार्थ्यांच्या पाण्यात उतरण्याची परवानगी कोणी दिली? किती पर्यवेक्षक होते? स्थानिक प्रशासनाच्या सूचना काय होत्या? सुरक्षिततेची व कोणती साधने उपलब्ध होती? या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर शोधले पाहिजे. निष्काळजीपणा आढळल्यास जबाबदारी निश्चित करून संबंधितावर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. दिवेआगरच्या समुद्राने आठ निष्पाप विद्यार्थी गिळलेले आहे. त्यांच्या स्मृतीला खरी श्रद्धांजली म्हणजे शोक व्यक्त करणे नव्हे तर भविष्यात तरी निष्पाप मुलाचा जीव वाचवणारी कार्यक्षम आणि तत्पर व्यवस्था उभी करून करणे होय. आता तरी समुद्राच्या आक्रोशातून सरकार. प्रशासन. शिक्षण संस्था. आणि समाजाने धडा घ्यावा कारण आई-वडिलांनी मुलांना सहलीला पाठवताना त्यांच्याकडून परत येण्याचे आश्वासन मागितलेले नसते ते फक्त त्यांच्या सुरक्षिततेवरती गाढ विश्वास ठेवत असतात. हा विश्वास तुटता कामा नये. याची काळजी सरकारी यंत्रणा. शिक्षणसंस्था.व त्याच्या प्रशासनाने घेण्याची आवश्यकता आहे.

# पितळेचे बिस्कीट देऊन सोने लुबाडले

### शिक्रापूर पोलिसांनी केला बीडमधून आरोपी जेरबंद; ४.५० लाखाचे तीन तोळे सोन्याचे दागिने हस्तगत

■ शिक्रापूर (दै. संध्या)

आधी गोड बोलून विश्वास जिंकला... नंतर सोन्याच्या बिस्कीटाचे आमिष दाखवले...आणि संधी साधून तीन तोळे सोन्याचे दागिने लंपास केले. मात्र, सीसीटीव्हीच्या नजरेतून चोरटा सुटला नाही. शिक्रापूर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत थेट बीड गाठले आणि फसवणूक करणाऱ्या आरोपीला जेरबंद केले. त्याच्याकडून महिलेचे तीन तोळे सोन्याचे दागिने हस्तगत केले.

अभिमान बाबू तुपे (वय ४९, रा.पिठ्ठी निरगुडी, ता.पाटोदा, जि.बीड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. करंदी येथील नंदा गणपत दरेकर (वय ५२) या २८ सप्टेंबर रोजी नातेवाईकांच्या कार्यक्रमासाठी खंडाळे येथे जात होत्या. शिक्रापूरच्या चाकण चौकात वाहनाची वाट पाहत असताना एका अनोळखी व्यक्तीने



त्यांच्याशी गोड बोलण्यास सुरुवात केली. बोलता बोलता त्याने त्यांचा विश्वास संपादन केला आणि त्यांना आपल्या मागे येण्यास सांगितले.

दरेकर यांना चाकण चौकातून तळेगाव ढमढेरे रस्त्यावरील सुपर बाजाराजवळील झाडाखाली नेण्यात आले. तेथे बोलण्याच्या ओघात त्यांच्या हातातील दोन सोन्याच्या बांगड्या कट करून आणि गळ्यातील सोन्याची पानपोत काढून घेण्यात आली. त्यानंतर आरोपीने त्यांच्या हातात सोन्यासारखे दिसणारे पितळेचे बिस्कीट ठेवले आणि 'हे तुमच्या सोन्यापेक्षा जास्त वजनाचे आहे,' असे सांगितले. आरोपी तेथून निघून गेल्यानंतर दरेकर यांनी बिस्कीट पाहिले. ते सोन्याचे नसल्याचे लक्षात येताच आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी दुसऱ्या दिवशी शिक्रापूर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याप्रकरणी शिक्रापूर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. फुटेजमधून आरोपीचा माग काढत पोलिस पथक बीड जिल्ह्यात पोहोचले आणि अभिमान तुपे याला ताब्यात घेऊन अटक केली. आणखी एक आरोपी निष्पन्न झाला असून त्याचाही शोध सुरू आहे. आरोपीकडून दोन सोन्याच्या बांगड्या आणि एक सोन्याची पानपोत असे तीन तोळे सोन्याचे दागिने पूर्णपणे हस्तगत करण्यात आले आहेत. त्यामुळे फसवणुकीच्या या प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी चोरीचा मुद्देमालही परत मिळवला आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलिस अधीक्षक शुभम कुमार व शिरूर विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी रविंद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्रापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस फौजदार लहानु बांगर, पोलिस हवालदार बापू हाडगळे, विश्वंभर वाघमारे व शिवाजी चितारे यांच्या पथकाने केली.

**महिलेचा विश्वास संपादन करून तीन तोळे सोने लंपास केल्यानंतर आरोपीने पोलिसांना चकवा देत बीड गाठले. मात्र, चाकण चौकापासूनच्या सीसीटीव्ही फुटेजने आरोपीचा माग काढला. शिक्रापूर पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित करत बीडमध्ये धडक दिली आणि आरोपीला बेड्या ठोकल्या. त्याच्याकडून महिलेचे तीन तोळे सोन्याचे दागिनेही हस्तगत करण्यात आले.**

## बनावट खाती पुरवणाऱ्या टोळीला अटक

■ पुणे (दै. संध्या)

सायबर गुन्ह्यांतील फसवणुकीची रक्कम वळवण्यासाठी बनावट बँक खात्यांचा (म्यूल अकाउंट) वापर करणाऱ्या टोळीतील मुख्य सूत्रधारासह पाचजणांना वानवडी पोलिसांनी अटक केली आहे. देशभरातील १९ नागरिकांची एक कोटी ८० लाख रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले असून, न्यायालयाने आरोपींना पोलिस कोठडी सुनावली आहे. श्रवण राजेंद्र अंकुशे (वय २५, रा. उरुळी देवाची), हरिओम हरिराम साहू (वय २४, रा. साळुंखे विहार, एनआयबीएम रस्ता), सौद इदफान शेख (वय २३), साहिल रौफ शेख (वय २५, दोघे रा. येरवडा) आणि तालीब नूरमहम्मद शेख (वय २५, रा. मोहनवाडी, येरवडा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र सायबर विभागाला फसवणुकीसाठी बनावट खाती वापरली जात असल्याची माहिती मिळाली. सायबर विभागाच्या सूचनेवरून वानवडी पोलिसांनी तपास सुरू केला. त्यावेळी काही राज्यांतील नागरिकांची फसवणुकीची रक्कम ही पुण्यातील या आरोपींच्या खात्यात जमा झाल्याचे उघडकीस आले. पोलिस तपासात श्रवण अंकुशे हा मुख्य सूत्रधार असल्याचे निष्पन्न झाले. त्याने साथीदार साहूच्या मदतीने इतरांना बनावट कागदपत्रांच्या आधारे बँक खाती उघडण्यास भाग पाडले होते. सायबर चोरट्यांकडून आलेली रक्कम खात्यात जमा झाल्यावर प्रत्येक व्यवहारामागे पाच हजार रुपयांचे कमिशन देण्याचे आमिष त्याने साथीदारांना दिले होते.

## जुन्नर तालुक्यात रब्बी हंगामासाठी पीक कर्ज वाटपाचा शुभारंभ

■ जुन्नर (दै. संध्या)



जुन्नर तालुक्यात पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. शनिवार ता. 3 रोजी जिल्हा बँकेचे संचालक अँड संजय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली काले, कुसुर व दातखिळेवाडी विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांच्या सभासद शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्यास सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती बँकेचे समन्वयक अधिकारी सुभाषराव कवडे व विभागीय अधिकारी बाळासाहेब मुरादे यांनी दिली. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या तालुक्यातील सतरा शाखा व 76 विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून पीक कर्जाचे वाटप करण्यात येते. गतवर्षीच्या रब्बी हंगामात तालुक्यातील 13984 सभासद शेतकऱ्यांना 79कोटी 26 लक्ष रुपयांच्या कर्जाचे वाटप करण्यात आले होते. तीस सप्टेंबर अखेरीस 62 कोटी 94 लक्ष रुपयांच्या पीक कर्जाची वसुली करण्यात आली असून वसुलीची टक्केवारी 79.42 टक्के एवढी होती. चालू वर्षीच्या या हंगामात सभासद शेतकऱ्यांना 92 कोटी रुपयांच्या पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट्य आहे. जिल्हा बँकेच्या वतीने तत्काळ पीक कर्ज वाटप केल्यामुळे सभासद शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात आले.

## डेंग्यू-मलेरिया च्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतची फॉगिंग मोहीम

■ कवठे येमाई (दै. संध्या)

डेंग्यू, मलेरिया यांसारख्या डासजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर कवठे येमाई गावठाणात अखेर ग्रामपंचायत प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. काल दि.३ ला सायंकाळी फॉगिंग मशिनद्वारे विविध भागांत औषध फवारणी करण्यात आली.या बाबत आमच्या दैनिकातून सविस्तर वृत्त देण्यात आले होते

कवठे येमाई गावात सध्या प्रचंड उकाडा आणि सायंकाळच्या वेळेत दोन ते तीन तास डासांचा वाढता उपद्रव यामुळे ग्रामस्थ अक्षरशः त्रस्त झाले आहेत. डासांची संख्या वाढत असल्याने डेंग्यू-मलेरियासारख्या आजारांचा धोका निर्माण होऊ नये, यासाठी ग्रामपंचायतीने प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून सातत्याने होत होती. ग्रामपंचायत कर्मचारी अजित शिंदे




व अमोल पंचरास यांनी फॉगिंग मशिनच्या माध्यमातून ग्रामपंचायत कार्यालय परिसर, वीर हनुमान मंदिर परिसर, मुख्य बाजारपेठ, तांबट आळी ते सोसायटी परिसर या भागांत औषध फवारणी केली.दरम्यान, फॉगिंगची सुरुवात झाल्याने ग्रामस्थांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी सध्याचा डासांचा प्रचंड उपद्रव पाहता केवळ एक-दोन दिवसांची फवारणी पुरेशी नसून सातत्यपूर्ण व व्यापक डास प्रतिबंधक मोहीम राबविण्याची गरज असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

गावातील साचलेले पाणी, नाले-गटारे, कचरा व इतर संभाव्य डास उत्पत्तीस्थळांची पाहणी करून त्यावरही तातडीने उपाययोजना कराव्यात. फॉगिंगसोबतच नियमित औषध फवारणी व स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.उशिराने का होईना, ग्रामपंचायत प्रशासनाने घेतलेली दखल स्वागतार्ह असली तरी आता ही मोहीम सातत्याने सुरू ठेवण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे.

## चार गुंडांवर "मोक्का" ही सुरुवात, गुन्हेगारीच्या उच्चाटनापर्यंत लढा सुरूच

■ श्रीरामपूर (दै. संध्या)

शहरातील वाढत्या संघटित गुन्हेगारीविरोधात सकल श्रीरामपूरकरांनी पुकारलेल्या लढ्याला पहिले यश आले आहे. पोलिसांनी चार प्रमुख गुंडांवर 'मोक्का'अंतर्गत कारवाई केल्याची माहिती मिळताच महात्मा गांधी चौकातील उपोषण शनिवारी रात्री मागे घेण्यात आले. मात्र, शहरातील गुन्हेगारीचे पूर्ण उच्चाटन होईपर्यंत हा लढा असाच सुरू राहील, असा स्पष्ट इशारा आमदार हेमंत ओगले, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते प्रकाश चित्ते आणि नगराध्यक्ष करण ससाणे यांनी शासकीय विश्रामगृहात आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत दिला. आकाश दुबय्या यांच्या हत्येनंतर श्रीरामपूरकरांचा रोष उफाळून आला होता. सलग चार दिवस कडकडीत बंद आणि विराट मोर्चानंतर २ ऑक्टोबरपासून महात्मा गांधी पुतळ्यासमोर प्रकाश चित्ते व कुणाल दुबय्या यांनी उपोषण सुरू केले होते. त्यात आमदार ओगले व नगराध्यक्ष ससाणे यांनीही सहभाग घेतला. अखेर पोलिसांनी गोरख जेधे, सोन्या बेग, अंकुश जेधे व मनोज साबळे यांच्यावर "मोक्का" लावल्याचे पत्र दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. नेत्यांनी स्पष्ट केले की, ही लढ्याची केवळ सुरुवात आहे. सोन्या बेग व गोरख जेधे अटकेत असले, तरी अंकुश जेधे आणि मनोज साबळे अद्याप फरार आहेत. शहरात अमली पदार्थांची विक्री, बेकायदेशीर जमिनींचे ताबे आणि आर्थिक गुन्हेगारी अद्याप पूर्णपणे रोखली गेलेली नाही.



## इंदापूर तालुक्यात पावसाविना दुष्काळ अन् 'ऑक्टोबर हिट'चा कडाका

■ वालचंदनगर (दै. संध्या)

इंदापूर तालुक्यातील लासुर्णे ते अंथूर्णे परिसरातील संत तुकाराम महाराज रस्त्यावर सध्या 'ऑक्टोबर हिट'चा तीव्र फटका बसू लागला आहे. कडक उन्हामुळे नेहमी वर्दळीचा असणारा हा महत्त्वाचा मार्ग आता दुपारच्या वेळी पूर्णपणे ओस पडत असल्याचे चित्र आहे. यंदा एल निनोच्या प्रभावामुळे संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने दगा दिल्याने पावसाळा नावापुरताच ठरला, आणि हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार आगामी हिवाळ्यातही कोरड्या हवेचेच सावट कायम राहण्याची शक्यता आहे. त्यातच राज्य सरकारने इंदापूर तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश केल्यामुळे चिंता आणखी

■ श्री संत तुकाराम महाराज रस्ता दुपारीच ओस!

वाढली आहे. सध्याच्या उष्णतेमुळे नागरिकांचे हाल होत असून, फॅन, एसी आणि कुलरशिवाय रात्रीची झोप लागणेही मुश्कील झाले आहे. पावसाचा पत्ता नसल्याने पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून शेतकरी मोठा संकटात सापडला आहे. एकीकडे शेतातील पिके धोक्यात आली असताना आणि आर्थिक गणित कोलमडले असताना, दुसरीकडे सण-उत्सव तोंडावर आल्यामुळे नागरिकांसमोर दुहेरी संकट उभे ठाकले आहे.

# बारामती कृषी महाविद्यालय बनत आहे कृषी संशोधनाचे केंद्रस्थान

■ विद्यार्थ्यांच्या संशोधनाला UK पेटंटची मोहर

■ कृषी पदवी विद्यार्थ्यांच्या चार नवकल्पनांना पेटंटची मान्यता

■ ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या संशोधन व नवकल्पनांच्या क्षेत्रातील भरीव कामगिरीला नवे यश

■ बारामती (दै. संध्या)

कृषी क्षेत्रातील विविध नाविन्यपूर्ण संशोधन, नवकल्पना आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रभावी उपाय शोधण्याच्या दिशेने ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या,डॉ.शरदचंद्र पवार कृषी व संलग्न महाविद्यालय, बारामती यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. कृषी महाविद्यालयातील पदवीच्या विद्यार्थ्यांच्या चार नवकल्पनांना UK पेटंट प्राप्त झाले असून, विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला मिळालेली ही मान्यता बारामतीच्या कृषी शिक्षण क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन आदरणीय श्री.



राजेंद्रदादा पवार आणि विश्वस्त तथा सचिव सौ.सुनंदाताई पवार यांच्या दूरदृष्टीतून कृषी शिक्षणाला संशोधन,नवकल्पना आणि प्रत्यक्ष शेतीतील समस्यांच्या निराकरणाशी जोडण्यावर सातत्याने भर दिला जात आहे. संशोधन आणि नवकल्पनांच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात परिवर्तन घडविणे,हा या संस्थेच्या कार्याचा महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता कृषी क्षेत्रातील समस्या ओळखून त्यावर शास्त्रीय व तंत्रज्ञानाधारित भविष्यातील उपाय शोधण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. महाविद्यालयात निर्माण करण्यात आलेल्या संशोधनाभिमुख वातावरणाचा हा परिणाम असून, पदवीच्या शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक युक्त प्रयोग, संशोधन,नाविन्यपूर्ण कल्पना आणि बौद्धिक संपदा निर्मितीच्या प्रक्रियेत सहभागी करून घेतले जात आहे. शविद्यार्थ्यांच्या कल्पनांना प्रत्यक्ष उपयोगी स्वरूप देण्यासाठी महाविद्यालयाच्या संशोधन विभागाकडून सातत्यपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. या यशामागे संस्थेचे संशोधन सल्लागार प्रा.श्री.अभिषेक ढवाण आणि त्यांच्या संशोधन समूहाचे मार्गदर्शन,तांत्रिक सहकार्य आणि अथक परिश्रम महत्त्वपूर्ण ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पना ओळखून त्यांना संशोधनाच्या दिशेने विकसित करणे,नवीन प्रयोगांच्या माध्यमातून त्यांची उपयुक्तता तपासणे आणि पेटंट मिळविण्याच्या प्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शन करणे,या सर्व बाबींमध्ये संशोधन समूहाने मोलाची भूमिका बजावली आहे. महाविद्यालयाची ही कामगिरी केवळ चार पेटंटपुरती मर्यादित नसून,संस्थेमध्ये रुजत असलेल्या संशोधन व नाविन्यपूर्ण कल्पनांच्या संस्कृतीचे प्रतीक आहे.

कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रोत्साहन देण्याबरोबरच विद्यार्थ्यांना स्मार्ट शेती, अत्याआधुनिक प्रयोगशाळा, आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि शेतकऱ्यांच्या वास्तविक समस्यांशी जोडण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न आहे. त्यामुळे येथील विद्यार्थी भविष्यातील कृषी संशोधक, उद्योजक, आधुनिक पद्धतीने शेती करणारा शेतकरी आणि कृषी परिवर्तनाचे नेतृत्व करणारे सक्षम व्यावसायिक म्हणून घडावेत, या दिशेने सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. या उल्लेखनीय यशासाठी ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे समन्वयक प्राध्यापक श्री.ए.बी. रासकर,कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अतुल गोंडे,कृषी व्यवसाय व्यवस्थापन कॉलेजच्या प्राचार्य सौ.आरती भोईटे, उपप्राचार्य श्री.एस.पी.गायकवाड व स्कूल ऑफ फार्मसीचे विभाग प्रमुख प्रा.श्री. सागर शिंदे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, संशोधन समूह,तांत्रिक कर्मचारी आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे.

पदवीपूर्व विद्यार्थ्यांच्या चार नाविन्यपूर्ण कल्पनांना मिळालेले पेटंट हे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला संशोधनाची दिशा,संशोधनाला नवकल्पनेची जोड आणि नवकल्पनेला मान्यतेची मोहर मिळाल्याचे द्योतक आहे. ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन आदरणीय राजेंद्रदादा पवार आणि विश्वस्त तथा सचिव सुनंदाताई पवार यांच्या दूरदृष्टीतून सुरू असलेल्या या संशोधनाच्या वाटचालीमुळे डॉ.शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालयाने कृषी शिक्षणाबरोबरच संशोधन आणि नाविन्यपूर्ण कल्पनांच्या क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

"शिक्षणातून संशोधन, संशोधनातून नवकल्पना आणि नवकल्पनेतून कृषी परिवर्तन" या दिशेने महाविद्यालयाची वाटचाल सुरू असून,विद्यार्थ्यांच्या या यशामुळे कृषी क्षेत्रातील भविष्यातील संशोधनाला निश्चितच नवी ऊर्जा मिळणार आहे.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# माजी सैनिकांच्या विविध प्रश्नांवर मंथन

## देशभरातील सुमारे साडेपाचशे माजी सैनिक व कुटुंबीयांचा सहभाग

■ कणेरी मठ येथे अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन उत्साहात संपन्न

■ पुणे (दै. संध्या)



अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे (ABPSSP) दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन कोल्हापूरजवळील सिद्धगिरी कणेरी मठ येथे ३ व ४ ऑक्टोबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. देशाच्या विविध राज्यांतून सुमारे साडेपाचशे पूर्व सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांनी अधिवेशनात सहभाग घेतला.

अधिवेशनाचे उद्घाटन सिद्धगिरी कणेरी मठाचे मठाधिपती पूजनीय श्री.अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज यांच्या उपस्थितीत झाले.वंदे मातरम् आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी महाराजांनी आपल्या आशीर्वचनातून राष्ट्रीय सुरक्षेमध्ये सैनिकांच्या योगदानाचे कौतुक केले. बदलती जागतिक व भूराजकीय परिस्थिती तसेच सैनिकांसमोरील नवनवीन आव्हानांवर त्यांनी मार्गदर्शन केले. परिषदेचे महाराष्ट्र व गोवा राज्य अध्यक्ष एअर मार्शल प्रदीप बापट यांच्या भाषणानंतर पूर्व सैनिकांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. CSD व DIAV चे अधिकारी तसेच इन्फंट्री स्कूल, बेळगावचे डेप्युटी कमांडंट ब्रिगेडियर मराठे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व विविध शंकांचे निरसन केले.देशातील विविध राज्यांच्या अध्यक्षांनी आपल्या राज्यातील परिषदेच्या कार्याचा आढावा सादर केला.

परिषदेचे सदस्य ग्रुप कॅप्टन तरुण सिंघा यांच्या मार्गदर्शनाखाली तयार होत असलेल्या परमवीर चक्र विजेते शहीद अल्बर्ट एक्का यांच्या जीवनावरील चित्रपटाचा टीझर यावेळी माजी सैनिकांना दाखविण्यात आला. सायंकाळच्या सत्रात कणेरी मठातील गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी संगीत,शारीरिक कौशल्ये व विविध कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. दुसऱ्या दिवशी परिषदेच्या राष्ट्रीय स्तरावरील विविध योजना व प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला.यावेळी परिषदेच्या महाराष्ट्र व गोवा राज्याच्या अधिकृत वेबसाईटचे अनावरण करण्यात आले. माजी सैनिकांच्या विविध समस्या व मागण्यांवर साधक-बाधक चर्चा करून त्या योग्य स्तरावर मांडण्यासाठी आवश्यक नियोजनावर विचारविनिमय करण्यात आला. दरम्यान,अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष लेफ्टनंट जनरल व्ही. के.चतुर्वेदी यांची पुढील तीन वर्षांसाठी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पुनर्नियुक्ती करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. समारोपाच्या सत्राला महाराष्ट्राचे माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई आवर्जून उपस्थित होते. त्यांनी माजी सैनिकांच्या नागरी जीवनातील योगदानाचे विशेष कौतुक केले.महाराष्ट्र शासनाच्या प्रस्तावित सैनिकी मॉल,वॉर मेमोरियल तसेच माजी सैनिकांसाठीच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्व प्रतिनिधींना त्यांनी दिली. अग्निवीरांच्या प्रश्नावर परिषदेने केलेल्या निवेदनाचा उल्लेख करताना महाराष्ट्र शासनाने सैनिक कल्याण विभागामार्फत अग्निवीरांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेत दहा टक्के समांतर आरक्षण देण्याचा घेतलेला निर्णय महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय अध्यक्ष लेफ्टनंट जनरल व्ही.के.चतुर्वेदी यांनी समारोपाच्या भाषणातून अधिवेशनातील कामकाजाचा आढावा घेत भविष्यातील कार्यासाठी दिशादर्शन केले. परिषदेचे मार्गदर्शक व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सहप्रचार प्रमुख प्रदीपजी जोशी यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. माजी सैनिकांनी आपल्या अनुभवाचा उपयोग करून नवनवीन विचार,उपक्रम आणि विविध मार्गांनी राष्ट्रसेवा कशी करता येईल, याबाबत त्यांनी मंथन करण्याचे आवाहन केले.

यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष लेफ्टनंट जनरल व्ही.के.चतुर्वेदी व प्रदीप जोशी यांनी सैन्य मातृशक्तीसोबत विशेष संवाद साधला.जिजाऊंच्या प्रेरणेने मातृशक्तीचे राष्ट्रनिर्माणातील योगदान अधोरेखित करण्यात आले.

राष्ट्रगीताने दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाची सांगता झाली. याप्रसंगी अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद चे महाराष्ट्र व गोवा राज्याचे अध्यक्ष एअरमार्शल प्रदीप बापट,उपाध्यक्ष एअर व्हाईस मार्शल नितीन वैद्य, ब्रिगेडियर अजित श्रीवास्तव आणि पदाधिकारी उपस्थित होते. या भव्य अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे स्थानिक पदाधिकारी कर्नल सुळकुडे,नायक आण्णासाहेब कुंभार तसेच कोल्हापूर माजी सैनिक समूहाने परिश्रम घेतले.तसेच कणेरी मठाचे सीईओ व सर्व पदाधिकाऱ्यांचेही आयोजनासाठी मोलाचे योगदान लाभले.त्यांच्या योगदानाबद्दल विशेष आभार व्यक्त करून यथोचित सन्मान करण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सम्यक विहार विकास केंद्र, बोपोडी येथे रिपब्लिकन पक्षाचा वर्धापन दिन साजरा!

पुणे : दैनिक संध्या

सम्यक विहार विकास केंद्र, बोपोडी येथे रिपब्लिकन पक्षाचा ६९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपमहापौर परशुराम वाडेकर, माजी उपमहापौर सुनिता परशुराम वाडेकर यांच्या उपस्थितीत पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते ज्वेल अँथोनी व गलेलू यांच्या हस्ते अशोकचक्रांकित निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महेंद्र निकाळजे व शेख साहेब यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना रिपब्लिकन पक्षाच्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास महिला पदाधिकारी, प्रमुख पदाधिकारी, ज्येष्ठ कार्यकर्ते व पक्षाचे असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजीनगर मतदारसंघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी केले.

### 'व्यसनमुक्त समाज – निरोगी समाज'चा संदेश देत व्यसनमुक्ती जनजागृती



पुणे : दैनिक संध्या

'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत वैद्यकीय प्रशासन अधिकारी, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा दवाखाना, कुरकुंभ येथे व्यसनमुक्ती जनजागृती व नशामुक्त जीवनशैली या विषयावर प्रभावी जनजागृती कार्यक्रमातून 'व्यसनमुक्त समाज – निरोगी समाज'चा संदेश देण्यात आला. वैद्यकीय अधिकारी डॉ. सिराजुद्दीन जमादार यांनी उपस्थितांना आरोग्यदायी व व्यसनमुक्त जीवनशैलीचा अंगीकार करावा, व्यसनाचा परिणाम केवळ व्यक्तीच्या शारीरिक आरोग्यावर होत नाही, तर त्याचा दूरगामी परिणाम कुटुंब, समाज आणि विशेषतः मुलांच्या शारीरिक, मानसिक व सामाजिक आरोग्य याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. "आपण केवळ आपल्या आरोग्याची काळजी न घेता आपल्या कुटुंबाची आणि सभोवतालच्या समाजाचीही काळजी घेणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्ती समाजाचा अविभाज्य भाग असून आपल्या सवयी व कृतींचा परिणाम इतरांवरही होत असतो," असे डॉ. जमादार यांनी नमूद करून डॉ. जमादार यांनी उपस्थितांना व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ दिली. व्यसनांपासून स्वतःला दूर ठेवण्यासोबतच कुटुंबीय व समाजामध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. यावेळी फार्मासिस्ट ऋषिकेश कोलसे यांनी व्यसनाचे विविध प्रकार, व्यसनामुळे आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम तसेच व्यसनमुक्त आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व याबाबत प्रभावी मार्गदर्शन केले. व्यसनापासून दूर राहणे ही केवळ वैयक्तिक जबाबदारी नसून निरोगी समाजनिर्मितीसाठी आवश्यक असलेली सामाजिक बांधिलकी आहे, हा संदेश यावेळी देण्यात आला. व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्यासाठी व्यसनाचे दुष्परिणाम, व्यसनमुक्ती आणि नशामुक्त जीवनशैली यासंदर्भातील विविध पोस्टर्स व माहितीपर चार्ट्स तयार करून प्रदर्शनातून उपस्थितांना व्यसनाच्या दुष्परिणामांची माहिती सोप्या व प्रभावी पद्धतीने देण्यात आली. कार्यक्रमास वैद्यकीय प्रशासन अधिकारी, विमाधारक तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### झोपेत कुऱ्हाडीचे घाव, पहाटे उघडकीस आला थरार...! चुलत नातू ताब्यात

पुणे : दैनिक संध्या

बारामती तालुक्यातील बाबुर्डी परिसरातील शेरेवाडी येथे दोन वृद्ध महिलांच्या निर्घृण हत्येने खळबळ उडाली होती. सुरुवातीला हा प्रकार चोरीच्या उद्देशाने बाहेरील व्यक्तीने केला असावा, असा संशय व्यक्त केला जात होता. मात्र, पोलिसांच्या तपासात या हत्याकांडाला वेगळेच वळण मिळाले असून, मृत महिलांचा चुलत नातू विकास राजेंद्र लडकत (वय २६) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, संशयितावर बँक तसेच फायनान्स कंपन्यांचे कर्ज असल्याची माहिती समोर आली आहे. कर्जाचे हप्ते थकल्याने निर्माण झालेल्या आर्थिक अडचणीतून पैशांची गरज भागविण्यासाठी चोरीचा प्रयत्न करण्यात आला असावा, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. याच प्रयत्नातून पुढे दुहेरी हत्याकांड घडल्याचा संशय आहे. शेरेवाडीतील दोन्ही वृद्ध महिला एकत्र राहत असल्याची माहिती संशयिताला होती, असा तपासातील प्राथमिक निष्कर्ष आहे. रात्रीच्या वेळी घरात प्रवेश केल्यानंतर महिलांनी संशयिताला ओळखल्याने गुन्हा उघडकीस येण्याची भीती निर्माण झाली असावी. त्यातून दोन्ही महिलांवर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याचा पोलिसांचा संशय आहे. दोन्ही महिला झोपेत असताना त्यांच्यावर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे. या हल्ल्यात दोघींचा मृत्यू झाला.

## मतदारांची सुनावणी ऑनलाईन, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची माहिती

■ पुणे (दै. संध्या)

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेंतर्गत २००२ च्या यादीशी जुळणी न झालेल्या पत्ते आणि नावांत दुरुस्ती असलेल्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. मात्र, नोटीस प्राप्त झालेल्या मतदारांना सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही. अपवादात्मक परिस्थितीत निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार सुनावणी घेण्यात येईल आणि ती शक्यतो ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. आवश्यक असल्यास मतदाराच्या वतीने कुटुंबातील कोणताही प्रौढ सदस्य सुनावणीस उपस्थित राहू शकणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. रात्रीच्या निवाऱ्यांमध्ये राहणारे नागरिक, कामगार, गरीब, बेघर तसेच इतर गरजू मतदारांसाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी आवश्यकतेनुसार पुरेशा संख्येने मदत कक्ष सुरू करावेत अथवा विशेष शिबिरे आयोजित करावीत. दरम्यान, दावे व हरकती दाखल करण्यासाठी १२ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे, असेही त्यांनी सांगितले. वाढीव कालावधीत कोणताही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी ३, ४, १० आणि ११ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरांमध्ये संबंधित बीएलओ उपस्थित राहतील. प्रारूप मतदार यादीत नावाची पडताळणी, नवीन मतदार नोंदणीसाठी नमुना ६, मतदार यादीतील तपशीलात दुरुस्तीसाठी नमुना ८ तसेच नोटीस प्राप्त झालेल्या मतदारांकडून आवश्यक कागदपत्रे स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे. प्रारूप मतदार यादीतील आपले नाव शोधणे, नवीन मतदार नोंदणीसाठी नमुना ६ भरणे तसेच मतदार यादीतील माहितीमध्ये दुरुस्तीसाठी नमुना ८ ऑनलाइन भरता येणार आहे.

## सासवड नगर परिषदेचा विविधांगी उपक्रमांना वेग

### स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, जनजागृतीसह नागरिकाभिमुख सेवा देण्यावर भर

■ पुणे (दै. संध्या)



'स्वच्छता ही सेवा २०२६' तसेच १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत सासवड नगर परिषदेच्या वतीने शहरात स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, जनजागृती आणि नागरिकांना विविध शासकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत असून 'सेवा संकल्प अभियान' केवळ स्वच्छतेपुरते मर्यादित न ठेवता नागरिकाभिमुख सेवा तातडीने व सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यावरही नगर परिषदेने भर देण्यात येत असल्याची माहिती मुख्याधिकारी कैलास चव्हाण यांनी दिली. स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, आरोग्य आणि लोकसेवा यांचा समन्वय साधत 'स्वच्छ, सुंदर, हरित आणि सक्षम सासवड' घडविण्याच्या दिशेने सासवड नगर परिषदेच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान' प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. मालमत्ता हस्तांतरण, नवीन नळ जोडणी, जन्म-मृत्यू नोंद प्रमाणपत्र, कर आकारणी, बांधकाम परवाना, झोन दाखला, बचत गट नोंदणी, ना-हरकत प्रमाणपत्र, ८-अ उतारा आदी विविध दाखले व सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अभियानाच्या अनुषंगाने शहरातील ६ महत्त्वाच्या ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छ व सुंदर सासवडच्या संकल्पनेला बळ देत सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत ग्रामीण रुग्णालय, सासवड यांच्या सहकार्याने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. स्वच्छ शहराच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याला या उपक्रमातून विशेष प्राधान्य देण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सण साजरे करण्याची भावना आणि पर्यावरण संवर्धनाचे संस्कार रुजविण्याचा प्रयत्न या अभियानांतर्गत करण्यात आला. याशिवाय सासवड शहरातील बाजारपेठ परिसर आणि व्यापाऱ्यांमध्ये 'प्लास्टिकमुक्ती अभियान' राबविण्यात आले. प्लास्टिकचा वापर कमी करून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्याचे आवाहन नागरिक व व्यापाऱ्यांना करण्यात आले.

## महिला आरोग्य, स्वच्छता, रक्तक्षय व पोषण जनजागृती कार्यक्रम संपन्न

■ पुणे (दै. संध्या)



सेवा संकल्प अभियानांतर्गत सेवा दवाखाना, कुरकुंभ येथे महिला आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता, रक्तक्षय व पोषण या विषयांवर जनजागृती कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. वैद्यकीय अधिकारी डॉ. सिराजुद्दीन जमादार यांनी सेवा संकल्प योजनेची माहिती देत अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये महिलांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

डॉ. ओंकार शेलारे यांनी रक्तक्षय व पोषण या विषयावर सविस्तर माहिती देताना संतुलित आहाराचे महत्त्व, शरीरासाठी आवश्यक विविध पोषक घटक, रक्तक्षयाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय तसेच नियमित रक्त तपासणीचे महत्त्व समजावून सांगितले.

तसेच वैयक्तिक स्वच्छता, मासिक पाळीतील स्वच्छता आणि रक्तक्षय याबाबत सोप्या व प्रभावी पद्धतीने जनजागृती करण्यात आली. यासाठी विविध माहितीपूर्ण पोस्टर्सचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. त्या माध्यमातून उपस्थित महिलांना दैनंदिन आरोग्यविषयक बाबी अधिक सहजपणे समजून घेता आल्या. दवाखाना कर्मचाऱ्यांनी विविध पौष्टिक खाद्यपदार्थांचे प्रत्यक्ष नमुने आकर्षक व माहितीपूर्ण पद्धतीने मांडून शैक्षणिक प्रदर्शन आयोजित केले. या प्रदर्शनातून पौष्टिक व संतुलित आहाराची निवड, आवश्यक पोषक घटकांचे महत्त्व तसेच टाळावयाचे अथवा मर्यादित प्रमाणात सेवन करावयाचे पदार्थ याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासोबतच "सुदृढ महिला, निरोगी कुटुंब" या संकल्पनेला बळ देणारा व माहितीपूर्ण मार्गदर्शन, दृश्य माध्यमांचा प्रभावी वापर आणि पौष्टिक आहाराच्या प्रत्यक्ष प्रदर्शनामुळे कार्यक्रम विशेष उपयुक्त असल्याचे महिलांनी सांगितले. यावेळी डॉ. जमादार यांनी १३ ऑक्टोबर रोजी आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात व १५ ऑक्टोबर रोजी आयोजित रक्तदान शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन उपस्थितांना केले.

## भूसंपादनची 'एनओसी' नसल्यास बांधकाम परवानगी नाही...!

■ पुणे (दै. संध्या)

रस्ता रुंदीकरणासाठी जागेच्या बदल्यात वाढीव एफएसआय, टीडीआरचा लाभ दिला जातो; मात्र संबंधित जागेवर महापालिकेचे नाव लागत नाही. पुढे प्रत्यक्ष जागा ताब्यात घेताना अडचणी निर्माण होतात आणि पालिकेला आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. या प्रकारांना आळा घालण्यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी बांधकाम परवानगी प्रक्रियेत भूसंपादन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र बंधनकारक केले आहे. महापालिका हद्दीत कलम २१० अंतर्गत रुंदीकरण करण्यात येणाऱ्या रस्त्यांवरील बांधकाम प्रस्तावांना ही अट लागू असणार आहे. भूसंपादन आणि व्यवस्थापन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच बांधकाम विभागाने परवानगी द्यावी, असे आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले आहे. या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महापालिका विविध रस्त्यांच्या रुंदीकरणास मान्यता देते. त्यानुसार जागामालकांना आणि विकसकांना वाढीव एफएसआय, टीडीआरसारखे लाभ मिळतात. मात्र, रुंदीकरणासाठी आवश्यक जागेचा ताबा आणि मालकी नोंदींची प्रक्रिया पूर्ण न झाल्यास पुढे पेच निर्माण होतो. बांधकामांना परवानगी मिळाल्यानंतर रस्त्याची जागा ताब्यात घेण्यातील अडचणी टाळण्यासाठी आता परवानगीपूर्वीच पडताळणी केली जाणार आहे. बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दाखल झाल्यानंतर शहर अभियंता आणि बांधकाम विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणारे क्षेत्र, जागेचा महापालिकेकडे आलेला ताबा, दिलेला मोबदला आणि रस्त्याच्या रुंदीनुसार सोडलेले फ्रंट मार्जिन यांची खातरजमा भूसंपादन विभागाकडून करून घ्यावी लागणार आहे.

# पुण्याचा गणेशोत्सव सुरळीत ठेवणाऱ्या पडद्यामागील कार्यकर्त्यांचा सन्मान

### मानाचा चौथा महागणपती श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्टच्यावतीने कृतज्ञता सन्मान सोहळा

■ पुणे (दै. संध्या)



सार्वजनिक उत्सव साजरे होताना काही कार्यकर्ते समोर दिसतात, तर काही जण पडद्यामागे राहून उत्सव यशस्वी करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. उत्सवानंतर रातोरात कचरा साफ करून दुसऱ्या दिवशी रस्ते स्वच्छ ठेवणारे सफाई कर्मचारी, वीज व्यवस्था सुरळीत ठेवणारे विद्युत कर्मचारी, तसेच २०-२० तास ड्युटी करून देखील वाहतुकीचे नियोजन चोख ठेवणारे पोलीस कर्मचारी यांचे योगदान महत्त्वाचे असते. अशा पडद्यामागे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करून तुळशीबाग गणेशोत्सव मंडळाने त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांचा सन्मान केला. मानाचा चौथा महागणपती श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्टच्यावतीने कृतज्ञता सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. बाजीराव रस्त्यावरील नू.म.वी प्रशालेच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार हेमंत रासने, नगरसेविका व पुणे महापालिकेच्या शहर सुधारणा समितीच्या सदस्या स्वप्नाली नितीन पंडित, नगरसेविका स्वरदा बापट, नगरसेवक कुणाल टिळक, उदय लेले, रवींद्र माळवदकर, प्रविण परदेशी, मंडळाचे उपाध्यक्ष विनायक कदम, कोषाध्यक्ष नितीन पंडित, किरण चौहान, सामाजिक कार्यकर्ते उदय जगताप, मोहन साखरिया आदी उपस्थित होते. अग्निशमन दल अधिकारी, जीव रक्षक, स्वच्छता कर्मचारी यांच्यासह वाद्यपथकतील वादक, सजावट कलाकार, मांडववाले, मेट्रो सेवा, पौरोहित्य करणारे गुरुजी यांचा देखील यावेळी सन्मान करण्यात आला.

हेमंत रासने म्हणाले, गणेशोत्सवाने अनेक कार्यकर्ते घडवले आहेत. आज जगातील १६० देशांमध्ये हा उत्सव साजरा केला जातो. हा उत्सव यशस्वी होण्यामागे अनेकांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान असते. उत्सवाच्या काळात पडद्यामागे राहून काम करणारे सफाई कर्मचारी, विद्युत कर्मचारी, पोलीस कर्मचारी आणि इतर घटक यांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे. ज्या लोकांच्या योगदानातून हा उत्सव साजरा होतो, त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे आणि त्यांचा सन्मान करणे ही आपली जबाबदारी आहे, असेही त्यांनी सांगितले. नितीन पंडित म्हणाले, मंडळाच्या वतीने दरवर्षी हा उपक्रम राबविला जातो. उत्सवादरम्यान पडद्यामागे राहून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. स्वतःच्या घरातील उत्सवात सहभागी होता येत नसतानाही ते आपले कर्तव्य चोखपणे बजावत असतात. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन त्यांचा सन्मान करणे, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे, विनायक घाटे यांनी सूत्रसंचालन केले.

# ओबेन इलेक्ट्रिक नंबर १ इलेक्ट्रिक मोटरसायकल ब्रँड

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक ओबेन इलेक्ट्रिक ने सप्टेंबर २०२६ मध्ये १,४१७ इलेक्ट्रिक मोटरसायकलची नोंदणी करत भारतातील सर्वाधिक विक्री करणारा इलेक्ट्रिक मोटरसायकल ब्रँड ठरला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार,वाहन आकडेवारीवर आधारित ही तिची आतापर्यंतची सर्वाधिक मासिक विक्री आहे. रॉर इवो या मॉडेलला मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे ओबेन इलेक्ट्रिकने हा महत्त्वाचा टप्पा गाठला. रॉर इवोची रचना भारतीय रायडर्सच्या दैनंदिन वापराचा आणि मोटरसायकल चालवण्याच्या अनुभवाचा विचार करून करण्यात आली आहे. कामगिरी, डिझाइन, तंत्रज्ञान, रेंज आणि दैनंदिन उपयुक्तता या बाबींवर लक्ष केंद्रित करत कंपनीने हे मॉडेल विकसित



केले आहे. इलेक्ट्रिक पॉवरट्रेनसोबत पारंपरिक मोटरसायकलच्या अपेक्षांनाही पूर्ण करण्याचा प्रयत्न रॉर इवोमधून करण्यात आला आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक वाहनांकडे वळू इच्छिणाऱ्या ग्राहकांसोबतच नियमित मोटरसायकलच्या निकषांवर वाहन निवडणाऱ्या रायडर्सनाही हे मॉडेल आकर्षित करत असल्याचा कंपनीचा दावा आहे. ओबेन इलेक्ट्रिक च्या संस्थापक आणि सीईओ मधुमिता अग्रवाल म्हणाल्या की, भारतातील सर्वाधिक विकला जाणारा इलेक्ट्रिक मोटरसायकल ब्रँड बनणे हा कंपनीसाठी महत्त्वाचा टप्पा आहे. ग्राहकांचा ओबेन आणि रॉर इवो वरील विश्वास या कामगिरीतून दिसून येतो. भारतातील मोठ्या मोटरसायकल बाजारपेठेत इलेक्ट्रिक मोबिलिटीचा विस्तार करण्यासाठी ग्राहकांच्या दैनंदिन गरजा आणि अपेक्षा पूर्ण करणाऱ्या मोटरसायकली विकसित करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. रॉर इवोला मिळालेला प्रतिसाद इलेक्ट्रिक मोटरसायकलींबाबत ग्राहकांची वाढती स्वीकारार्हता दर्शवत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

रॉर इवोच्या विक्रीसोबतच कंपनीने उत्पादन क्षेत्रातही महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. ओबेन इलेक्ट्रिक ने बेंगळुरू येथील उत्पादन केंद्रातून नुकतीच आपली १०,०००वी इलेक्ट्रिक मोटरसायकल बाहेर आणली. कंपनीच्या वाढत्या उत्पादन क्षमतेचे हे प्रतिबिंब असल्याचे कंपनीने म्हटले आहे. ओबेन इलेक्ट्रिक चा व्यवसाय R&D-केंद्रित आणि व्हर्टिकली इंटिग्रेटेड पद्धतीवर आधारित आहे. कंपनी एलएफपी बॅटरी, मोटर्स, व्हीसीयु, चार्जर्स आणि सॉफ्टवेअर यांसारख्या महत्त्वाच्या ईव्ही तंत्रज्ञानाचा इन-हाऊस विकास आणि उत्पादन करते. त्यामुळे तंत्रज्ञान विकासापासून अभियांत्रिकी, गुणवत्ता आणि उत्पादनापर्यंतच्या प्रक्रियांवर कंपनीला अधिक नियंत्रण ठेवता येते.

कंपनीकडे बेंगळुरूमध्ये ३.५ एकरांचे उत्पादन केंद्र असून त्याची वार्षिक उत्पादन क्षमता १ लाख मोटरसायकलींची आहे. ग्राहकसेवा मजबूत करण्यासाठी ओबेन ने १८ राज्यांतील ९० हून अधिक शहरांमध्ये १५० पेक्षा अधिक शोरूम आणि ओबेन केअर सर्व्हिस सेंटर्सचे नेटवर्क उभारले आहे. या नेटवर्कद्वारे विक्री, टेस्ट राईड, डिलिव्हरी आणि विक्रीपश्चात सेवा उपलब्ध करून दिली जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### स्वसंरक्षण कार्यशाळेचे आयोजन

पुणे : दैनिक संध्या

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गणेशखिंड येथे इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थिनींसाठी महिला स्वसंरक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. पंख संस्थेच्या 'शाळांगण' समुपदेशन प्रकल्पांतर्गत ही कार्यशाळा घेण्यात आली. भारतीय सैन्याच्या माजी अधिकारी कॅप्टन तनुजा काब्रे यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे महत्त्व, सुरक्षिततेबाबत जागरूकता, प्रसंगावधान आणि संकटाच्या वेळी योग्य निर्णय घेण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी स्वसंरक्षणाच्या विविध तंत्रांचे प्रात्यक्षिक करून दाखवले आणि विद्यार्थिनींकडून त्यांचा सराव करून घेतला. कार्यशाळेत सुमारे २२५ विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रत्यक्ष सराव आणि संवादात्मक पद्धतीमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास व सुरक्षिततेबाबतची जाणीव वाढली. धैर्य, आत्मविश्वास आणि स्वतःच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेण्याची भावना निर्माण करणे, हा उपक्रमाचा उद्देश होता. यावेळी मुख्याध्यापिका रोहिणी काळे, पर्यवेक्षिका विद्या वाईकर, पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, समुपदेशक व शिक्षक उपस्थित होते.

### शाहू शाळेत म. गांधी व शास्त्री जयंती साजरी

चिंचवड : दैनिक संध्या

बोधिसत्व प्रतिष्ठान शिक्षण संस्था संचालित राजर्षी शाहू महाराज विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी ज्ञानदीप विद्यालय माजी प्राचार्य सुबोध गलांडे दुर्गेश पुराणिक, शिवाजी घोडे, संस्थेचे अध्यक्ष गोकुळ गायकवाड सचिव लहू कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केले. श्री गलांडे म्हणाले कि, "वर्तमान काळामध्ये जगाला महात्मा गांधी आणि तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या विचारांची नितांत गरज आहे."त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना सत्य, अहिंसा, शांतता आणि मानवतेचा संदेश मिळाला.

# शिवनेरीचे वैभव या पुस्तकाची ऑनलाईन नोंदणी सुरू

■ मुंबई (दै. संध्या)

ग्रंथाली प्रकाशित 'शिवनेरीची श्रीमंती' या पहिल्या पुस्तकाच्या अपूर्व यशानंतर 'शिवनेरीचे वैभव' हे स्तंभलेखक संजय नलावडे यांचे दुसरे पुस्तक प्रकाशित झाले आहे. हिंदवी स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यासाठी छत्रपती शिवरायांना शिवनेरीवर ज्ञान, चारित्र्य, चातुर्य, संघटन व पराक्रम अशा सत्वगुणांचे संस्कार देणाऱ्या राजमाता जिजाऊ माँसाहेबांचे उपकार ही शिवजन्मभूमी कधीही विसरणार नाही. स्वराज्याच्या स्वप्नाचा पवित्र पाया असलेला किल्ले 'शिवनेरी' प्रेरणा आणि स्वाभिमानाचा दिपस्तंभ आहे. आपल्या स्वतःच्या पुत्रापेक्षा मराठी मुलुखाच्या भवितव्याचा विचार करणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊंनी संस्कार, स्वाभिमान, शौर्य आणि स्वराज्याची प्रेरणा रुजवून या जुन्नरच्या भूमीला शतकानुशतके पुनीत केले आहे. शिवनेरीच्या शिखरावर उभे राहून दूरवर पसरलेल्या भूमीकडे पाहताना... या मातीतून प्रेरणा घेऊन अनेकांनी निस्वार्थ सेवेने, त्यागाने आणि संघर्षमय कार्याने समाजमनावर अमीट छाप सोडली आहे. समाजाला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपणारी आणि माणुसकी व समाजसेवा हाच ज्यांच्या जीवनाचा श्वास राहिला अशी विविध क्षेत्रातील अनेक असामान्य व्यक्तिमत्त्व या शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्यातील गावागावाने पाहिली आहेत. स्तंभलेखक संजय नलावडे यांनी रेखाटलेल्या अशाच एकोणतीस व्यक्तीचित्रणांचा माहितीपूर्ण लेखसंग्रह असलेले 'शिवनेरीचे वैभव' हे दुसरे पुस्तक मुंबईतील ग्रंथाली प्रकाशनने प्रकाशित केले आहे.

# राधेच्या निःस्वार्थ भावनेतून "दानवीर कर्ण" घडण्याचा पाया रचला जातो

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

सोनी सबची हस्तिनापुर के वीर मालिका तरुण पांडव आणि कौरवांच्या जडणघडणीच्या काळाचा मागोवा घेते आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे तसेच पुढे ते जे बनतात त्याची पायाभरणी करणारे अनुभव उजेडात आणते. मालिकेतील नवीन पात्र राधे (व्यंकटेश पांडे) आपल्या आजूबाजूच्या लोकांना मदत करण्याच्या नैसर्गिक वृत्तीमुळे विशेष ठरतो. स्वतःकडे असलेलं इतरांसोबत वाटून घेणं असो किंवा गरजूंना मदत करणं असो, राधे दुसऱ्यांच्या आनंदाला आणि हिताला नेहमी स्वतःपेक्षा अधिक महत्त्व देतो. पुढे हाच गुण त्याला 'दानवीर कर्ण' म्हणून ओळख मिळवून देतो. आगामी भागांमध्ये, राधेचा दयाळू स्वभाव तेव्हा समोर येतो जेव्हा तो गावातील एका महिलेला तिच्या लहान मुलाला अन्न देण्यासाठी संघर्ष करताना पाहतो. क्षणाचाही विचार न करता, राधे आपल्या



कुटुंबाच्या दिव्यासाठी ठेवलेलं तूप तिला देतो, कारण त्याच्या मते उपाशी मुलाला अन्न मिळणं अधिक महत्त्वाचं आहे. त्याची दयाळूपणा इथेच थांबत नाही. जखमी झालेल्या एका घोड्याला निरुपयोगी समजून सोडून दिलं जाणार असताना, राधे त्याची काळजी घेतो, त्याला पुन्हा बरा करतो आणि कुटुंबातील सदस्याप्रमाणे सांभाळतो. मात्र, जेव्हा त्याच्या मित्राच्या कुटुंबाला घोड्याची गरज भासते, तेव्हा राधे पुन्हा एकदा स्वतःपेक्षा इतरांच्या गरजांना प्राधान्य देत तो घोडा त्यांना देऊन टाकतो.

सध्याच्या ट्रॅकबद्दल बोलताना व्यंकटेश म्हणाले, "राधेचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन खूप साधा आहे. प्रत्येक जीवाचं महत्त्व असतं, मग तो माणूस असो किंवा प्राणी, आणि कोणी पाहत नसलं तरी दयाळूपणा दाखवणं आणि योग्य गोष्ट करणं महत्त्वाचं आहे, यावर त्याचा विश्वास आहे. इतरांप्रती असलेली त्याची दानशूर वृत्ती आणि करुणा त्याला जमिनीशी घट्ट जोडून ठेवतात. त्याचा प्रवास पुढे उलगडत असताना, त्याचं दयाळू मन आणि दानवीर वृत्ती त्याच्या निर्णयांना आणि तो निर्माण करणाऱ्या नात्यांना कसा आकार देतात, हे प्रेक्षकांनी पाहावं यासाठी मी उत्सुक आहे. 'दानवीर कर्ण'चा प्रवास अनुभवताना प्रेक्षकांना नक्कीच आनंद मिळेल, अशी मला आशा आहे." दर सोमवार ते शनिवार रात्री 9:00 वाजता सोनी सबवरील हस्तिनापुर के वीर पाहण्यासाठी ट्यून इन करा.

# 'बीएनसीए' मध्ये 'बांधकामातील मेम्ब्रेन स्ट्रक्चर्स' या विषयावर कार्यशाळा संपन्न

■ जर्मनीतील आयएमएस बाऊ हाऊस संस्थेच्या उपसंचालक प्रा. सारा वॉन्डरवीथ यांचे मार्गदर्शन

■ पुणे (दै. संध्या)

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनच्या (बीएनसीए) आर्किनिअरिंग विभागाने मेम्ब्रेन स्ट्रक्चर्स या विषयावर एक हस्तकला कार्यशाळा चौथ्या वर्षातील विद्यार्थिनींसाठी नुकतीच घेतली. कार्यशाळेचा विषय 'मेम्ब्रेन बांधकामः संकल्पना ते आकार' असा असून त्यामध्ये जर्मनीतील देसाऊ येथील आयएमएस बाऊ हाऊसच्या उपसंचालक प्रा.सारा वॉन्डरवीथ तसेच त्यांचे सहकारी प्रा.देवांशी मोदी आणि प्रा. खिश्वन वॉन्डरवीथ यांनी मार्गदर्शन केले. प्रा.डॉ. पूर्वा कुलकर्णी आणि प्रा. स्मिता ओगले यांच्या समन्वयातून कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेपूर्वी बीएनसीएच्या प्रभारी प्राचार्य डॉ.शुभदा कमलापूरकर आणि आंतरराष्ट्रीय कक्ष प्रमुख डॉ. श्रुती जोशी यांनी आयोजकांचे स्वागत केले. यावेळी बीएनसीएच्या संशोधन विभाग प्रमुख डॉ. मीरा शिरोळकर, तसेच प्रा.जयंत पटवर्धन, प्रा. सुजाता मेहता, प्रा. सुवर्णा आखेगावकर, प्रा. दिलीप शिंदे उपस्थित होते. या कार्यशाळेत बीएनसीएच्या लॅण्डस्केप आर्किटेक्चर विभाग प्रमूख डॉ. स्वाती सहस्रबुद्धे तसेच प्रा. श्वेता अलबाळ याही सहभागी झाल्या होत्या.

कार्यशाळेत प्रा.सारा वॉन्डरवीथ यांनी त्यांच्या संस्थेची माहिती सांगताना मेम्ब्रेन स्ट्रक्चर्समध्ये आंतरविद्याशाखीय विचार कसा वापरता येतो यामागचे तत्त्व सांगून प्रात्यक्षिक करून दाखवले.

त्यामध्ये मेम्ब्रेन स्ट्रक्चर्समधील चार मूलभूत तत्त्वांवर आधारित विद्यार्थिनींचे



गट तयार करण्यात आले आणि त्यांना हस्तकलेतून विविध मॉडेल्स तयार करण्याचा अनुभव विद्यार्थिनींना मिळाला.

प्रा. सारा वॉन्डरवीथ व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थिनींच्या कल्पकतेतून तयार केलेल्या मॉडेल्सची पाहणी करताना त्यातील भौमितिक आकारांना प्रत्यक्ष आकार देण्यास मदत केली.

कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी विद्यार्थिनींनी साकारलेल्या मॉडेल्सचे सादरीकरण केले. प्रा.सारा वॉन्डरवीथ यांनी या आकृतीबंधांमागील शैली, वापरलेले साहित्य, त्यातील ताण आणि तयार झालेल्या बांधकाम आकृतीबंधाचे वर्तन यावर मार्गदर्शनपर भाष्य केले. या साऱ्या कार्यशाळेतून सहभागी विद्यार्थिनींना आर्किटेक्चरच्या शैक्षणिक अंगाबरोबरच बांधकामातील प्रयोग आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या डिझाइन संकल्पनेबाबत समृद्ध भान येण्यास मदत झाली.

डॉ. पूर्वा कुलकर्णी म्हणाल्या की, यापूर्वी आयएमएस बाऊ हाऊस यांच्याबरोबर मेम्ब्रेन स्ट्रक्चर्स या विषयावरील विविध संकल्पनांचे आदान प्रदान करण्यात आले असून यातील विविध संकल्पनांबाबत अर्थपूर्ण सुसंवाद झाला आहे. या कार्यशाळेतून विविध डिझाईन व आकृतीबंध निर्माण करण्याच्या शक्यता आजमावून पाहणे शक्य झाले आहे.

कार्यशाळेत सहभागी विद्यार्थिनींनी हस्तकौशल्याच्या साधनांमधून विविध प्रकारचे मेम्ब्रेन स्ट्रक्चर्स आकृतीबंध साकारले. त्यातून या बांधकाम प्रकारातील विविध आकार व सर्जनशील निर्मितीच्या शक्यता आजमावून पाहता आल्या.

## जाहीरनामा

जुन्नर येथील मे. ए. एम. हुसेन सो. दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांचे न्यायालयात
ॲड. सी. एस. डहाळे
दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : १९/२०२५
नि. ३१
पु.ता. २१/०९/२०२६

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९/२०२५ ज्यापेक्षा मयत व्यक्तीचे नाव कै. शांताराम बाळु खुटाळ हे एम. जी. एम. हॉस्पीटल, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९ या ठिकाणी दि. ०४/०७/२०१८ रोजी किंवा त्यासुमाराम येथे मयत झाले आणि अर्जदार बाळु नाथा खुटाळ मौजे मंगरुळ पारगाव खुटाळमळा, ता. जुन्नर, जिल्हा पुणे यांनी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

कोर्टास सदर मयत व्यक्ती कै. शांताराम बाळु खुटाळ हे दि. ०४/०७/२०१८ मृत्यु रोजी मयत झाले. त्यामुळे कायद्याने मयत (Heirship Certificate) झाल्याचा ठराव करण्यात यावा. त्यामुळे त्यांना अर्जदार हेच वारस आहे. मयत कै. शांताराम बाळु खुटाळ यांनी या अर्जदाराशिवाय कुठलेही जवळचा नातेवाईक अथवा कायदेशिर वारस नाहीत. सदर मयत कै. शांताराम बाळु खुटाळ यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, म्हणून दावा केला आहे. सदरहू अर्जदार कै. शांताराम बाळु खुटाळचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून १ महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू कायदेशीर वारस असल्याचे सर्टिफिकेट देईल.

दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझ्या सहिनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिले असे.

हुकूमावरून,
सही/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर, जुन्नर

शिक्का

# सीमावर्ती भागात शिवराय-महाराणा प्रताप यांच्या शौर्याची प्रेरणा मिळेल

■ निवृत्त ब्रिगेडियर हेमंत महाजन

■ पुण्यातील 'शिवसृष्टी'तून 'शिव-राणा शौर्य यात्रा' रवाना

■ पुंछ येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा, तर धर्मशाला येथे महाराणा प्रताप यांचा पुतळा होणार प्रस्थापित

■ पुणे (दै. संध्या)

छत्रपती शिवाजी महाराज आणि वीर शिरोमणी महाराणा प्रताप हे शौर्य, पराक्रम आणि स्वाभिमानाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांचे पुतळे सीमावर्ती भागात प्रस्थापित केल्याने आपल्या समृद्ध इतिहासाचा आणि शौर्यपरंपरेचा संदेश तेथील जवान तसेच नागरिकांपर्यंत पोहोचेल. पुंछ सारख्या संवेदनशील भागात तसेच भारत-चीन सीमेकडे जाणाऱ्या या स्मारकांमुळे जवानांना आणि स्थानिक नागरिकांना प्रेरणा मिळेल, असे मत निवृत्त ब्रिगेडियर हेमंत महाजन यांनी व्यक्त केले.

शिवसृष्टी, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, आम्ही मावळे आणि कॉसमॉस ग्रुप यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यात्रेच्या प्रारंभी शिवसृष्टी येथे दोन्ही पुतळ्यांचे मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. विलास वाहने, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे



कार्यवाह सुधीर थोरात, शिल्पकार महिंद्र थोपटे, कॉसमॉस ग्रुपचे जनक शाह, 'आम्ही पुणेकर' संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव, शिवसृष्टीचे व्यवस्थापक अनिल पवार आदी उपस्थित होते. पुण्यातील आंबेगाव येथील शिवसृष्टीतून छत्रपती शिवाजी महाराज आणि वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यांची 'शिव-राणा शौर्य यात्रा' रवाना झाली. 'आम्ही पुणेकर' संस्थेच्या वतीने आयोजित या यात्रेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा जम्मू-काश्मीरमधील पुंछ येथे, तर वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचा पुतळा हिमाचल प्रदेशातील धर्मशाला येथे प्रस्थापित करण्यात येणार आहे. डॉ. विलास वाहने म्हणाले, 'आम्ही पुणेकर' संस्था गेल्या अनेक वर्षांपासून सीमेवरील जवानांना आणि देशवासीयांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने महाराष्ट्रातील ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांची स्मारके सीमावर्ती भागात पोहोचविण्याचे कार्य करीत आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात आणि सीमावर्ती भागात इतिहास व राष्ट्रभक्ती पोहोचविणारा हा उपक्रम आहे. हेमंत जाधव म्हणाले, यापूर्वी कुपवाडा आणि पुंछ येथे नियंत्रण रेषेजवळ छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात आले आहे. तसेच जपानमधील टोकियो येथेही शिवरायांचे स्मारक साकारण्यात आले आहे. आता छत्रपती शिवाजी महाराज आणि वीर शिरोमणी महाराणा प्रताप या दोन महान योद्ध्यांचे पुतळे एकत्रितपणे सीमेकडे घेऊन जाण्याचा हा उपक्रम आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसिने कळवण्यात येते की, खालील परिषष्ठ मध्ये नमूद मिळकत श्री. अनिल रातनचंद शाह रा. पुणे यांचे मालकीची असून, त्यांनी खालील नमूद जमीन आमचे अशिलांना विक्री करण्याचे मान्य व काबुल केले आहे. तसेच खालील परिशिष्टा मधील जमीन हि श्री. अनिल रातनचंद शाह यांची मालकी हक्काची, निजोखमी निर्वेध व बोजारहित असल्याची खात्री आमच्या अशिलांना त्यांनी दिली आहे. तरी सदर मिळकतीचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार, करार, मालकी हक्क, हक्क, हितसंबंध, ताबा, गहाण, बोजा, अथवा इतर कोणताही दावा/हरकत असल्यास, संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह खालील पत्त्यावर लेखी कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदर मालमत्तेबाबत कोणताही दावा / हरकत नाही असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करण्यात येईल. तसेच मुदतीत हरकत/ तक्रार न आल्यास सदर मिळकतीत असणारे सर्व हक्क, हितसंमंध जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येईल.

परिशिष्ट : तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका पुरंदर, मे. सब रजिस्ट्रार साहेब पुरंदर, बेलसर ग्रामपंचायत, यांचे हद्दीतील गाव मौजे बेलसर, येथील यांसी गट न.२२३१/१ यांसी क्षेत्र ३ आर म्हणजेच ३०० चौ. मी. व गट न. २२३१/२ यासी क्षेत्र २५.३० आर म्हणजेच २५३० चौ. मी. अधिक पोट खराबा यासी क्षेत्र १ आर म्हणजेच १०० चौ. मी. असे एकूण क्षेत्र २६.३० आर म्हणजेच २६३० चौ. मी. व त्यातील सर्व हक्क व अधिकारासहीत कोणतेही हक्क व अधिकार राखून न ठेवता तसेच सदर मिळकतील जाणे येणेचे वहिवाटीची हक्कासह.

सही/-
अथर्व सु. देशपांडे (ॲडव्होकेट)
फ्लॅट नं २८, बिल्डिंग नं ३,
चतुरधाम सोसायटी,
लोकमान्य नगर, लाल बहादूर
शास्त्री रोड, नवीपेठ पुणे ४११०३०

शिक्का

## जाहीर नोटीस

मे. ए. एम. हुसेन कोर्ट,
दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, जुन्नर, जि. पुणे.
दि. कि. अ.नं. २४/२०२६
निशाणी : ०७

**अर्जदार :- अशोक दत्तात्रय पानसरे, रा. ओतूर पानसरे आळी, ता. जुन्नर, जि. पुणे.**

नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ अन्वये अन्वये या कोर्टाकडे मयत कै. दत्तात्रय महादेव पानसरे व शकुंतला दत्तात्रय पानसरे मृत्यू अनुक्रमे दि.२५/११/२०१९ व दि. ०५/०९/२०२४ यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासंबंधीचा अर्ज केलेला आहे. शेअर्सचे वर्णन :- दत्तात्रय महादेव पानसरे यांचे जमिनीचे वर्णन तु. पुणे. पो. तु. तालुका, ग्रामपंचायत नारायणगावचे हद्दीतील शिवविहार सह-निर्माण संस्था मर्या. या हौसिंग सोसायटीमधील "शिवतेज" बिल्डींगमधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट

| अ. ग्रा.मि.नं. | क्षेत्रफळ |
|---|---|
| १०००६/०६ | ४१० चौ. फुट मापाचे आर.सी.सी. बांधकाम संडास व बाथरुमसह पहिला मजला |

येणेप्रमाणे वर्णनाचा फ्लॅट, त्यातील लाकुडफाटा, दगडविट, व इतर तदंगभूत वस्तुसह

| अ. ग्रा.मि.नं. | क्षेत्रफळ |
|---|---|
| १०००६/०७ | ४०० चौ. फुट मापाचे आर.सी.सी. बांधकाम, दोन रूम, संडास, व बाथरुमसह पहिला मजला |

येणेप्रमाणे वर्णनाचा फ्लॅट, त्यातील लाकुडफाटा, दगडविट, व इतर तदंगभूत वस्तुसह

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यानी दि. १३/१०/२०२६ रोजी ठिक ११.०० वाजता स्वतः किंवा वकीलामार्फत या कोर्टात हजर रहावे.

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर जुन्नर

शिक्का

# पीपल्सच्या विश्वस्तपदी बनसोडे यांची निवड योग्य : रामदास आठवले

**विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांचा नागरी सत्कार संपन्न**



■ पिंपरी (दै. संध्या)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ८ जुलै १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. सध्या मी या संस्थेचा अध्यक्ष आहे. या संस्थेचे पिंपरी चिंचवड शहरात भव्य शैक्षणिक संकुल उभारणे, तसेच या संस्थेच्या माध्यमातून राज्यात सर्वदूर शिक्षणाचे जाळे वाढवून दरवर्षी दोन लाख विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्याचा संकल्प आहे. हे ध्येय गाठण्यासाठी या संस्थेच्या शासकीय नियामक मंडळावर महाराष्ट्र राज्य विधान सभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांची निवड योग्य असल्याचे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी केले. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या शासकीय नियामक मंडळावर महाराष्ट्र राज्य विधान सभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांची नियुक्ती झाली आहे. त्यानिमित्त शनिवारी (दि. ३ ऑक्टोबर) बनसोडे यांचा भव्य नागरी सत्कार केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते पिंपरी येथे करण्यात आला आहे.

यावेळी सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य संजय शिरसाट, आमदार महेशदादा लांडगे, गोपीचंद पडळकर, माजी आमदार विलास लांडे, भंते राहुल बोधी, पीपल एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त चंद्रशेखर कांबळे, नागसेन कांबळे, माजी महापौर योगेश बहल, मंगलाताई कदम, संजोग वाघेरे पाटील, माजी उपमहापौर अमर मुलचंदाणी, नगरसेवक राहुल भोसले, परशुराम वाडेकर, सिद्धार्थ बनसोडे तसेच प्रिया अण्णासाहेब बनसोडे, सुनील मगरे, संयोजक व सत्कार समितीचे पदाधिकारी सुरेश निकाळजे, अंजना गायकवाड, गोपाळ मोरे, निलेश निकाळजे, प्रमोद क्षीरसागर, गंगाताई धेंडे, नितीन ओव्हाळ, संदीप पिसाळ, राहुल सोनवणे आदींसह हजारो बंधू भगिनी उपस्थित होते.

यावेळी रामदास आठवले यांनी सांगितले की, अण्णा बनसोडे हे शरद पवार व अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले नेतृत्व आहे. अण्णा बनसोडे, मंत्री संजय शिरसाठ, मी स्वतः निवडणुकीत जिंकून आलो आणि हरलो देखील. बनसोडे ३ वेळा निवडून आले, शिरसाट ४ वेळा निवडून आले, मी केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारमध्ये सलग ३ वेळा मंत्री आहे आणि आता चौथ्यांदा देखील मी मंत्री होईल. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करण्याचे ध्येय ठेवून पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन ही संस्था वाढवली. अण्णा बनसोडे आणि मी देखील सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाऊ असे रामदास आठवले यांनी सांगितले मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, मी कधीतरी आमदार होईल विधान भवनात जाईल हे स्वप्नातही येत नव्हते परंतु, रामदास आठवले, अण्णा बनसोडे यांच्यासह मला मंत्री आणि विधानभवनात तालिका अध्यक्ष होण्याची संधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे मिळाली. अण्णा बनसोडे यांना शुभेच्छा देताना शिरसाठ पुढे म्हणाले की, या संस्थेत तुम्ही चांगले काम करा, सरकारचा मंत्री म्हणून या संस्थेला आवश्यक निधी देण्याची जबाबदारी मी घेतो. तुम्हाला मिळालेल्या अधिकाराचा लोकांच्या कल्याणासाठी वापर करा, प्रगती करा पण स्वाभिमान घाण ठेवू नका, सध्याच्या कठीण काळात लोकशाही टिकवण्याची जबाबदारी तुमच्या, आमच्यावर आहे.

सत्काराला उत्तर देताना अण्णासाहेब बनसोडे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वर्गीय अजित दादा पवार यांना विनम्र अभिवादन करतो आणि आजच्या या माझ्या सत्कार समारंभासाठी आवर्जून उपस्थित राहिलेले देशाचे केंद्रीय मंत्री सामाजिक न्याय मंत्री आदरणीय रामदासजी आठवले साहेब, महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आमचे सहकारी संजयराव शिरसाट, विधिमंडळातील माझे सहकारी भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे, दुसरे माझे सहकारी गोपीचंद पडळकर, भोसरी मतदारसंघाचे माजी आमदार विलास लांडे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सामाजिक न्यायचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, भंते राहुल बोधी साहेब, एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त चंद्रशेखर कांबळे, नागसेन कांबळे, पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर,

माझे सहकारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पिंपरी चिंचवड शहराचे अध्यक्ष योगेश बहल आणि व्यासपीठावर उपस्थित असलेले पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सर्व नगरसेवक आजी, माजी नगरसेवक नगरसेविका आणि या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहिलेले माझे सोलापूर, नाशिक, मनमाड आणि पिंपरी चिंचवड शहरातील सर्व सहकारी, सत्कार समितीचे सुरेश निकाळजे, अंजना गायकवाड व त्यांचे सहकारी, पिंपरी चिंचवड शहरातील आरपीआयचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि खऱ्या अर्थाने हा जो कार्यक्रम या ठिकाणी ज्यांनी आयोजित केला ते माझे सहकारी सुरेश निकाळजे आणि त्यांचे सर्व सहकार्यांना मी सर्वप्रथम मनापासून धन्यवाद देतो. आज हा आनंदाचा क्षण आहे. आपण दिलेले प्रेम आणि आपुलकी मी आयुष्यभर विसरणार नाही. हा केवळ माझा वैयक्तिक सत्कार नसून माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाचा सन्मान आहे. सोसायटीचे विश्वस्त यांनी केलेली माझी निवड ही माझ्यासाठी निश्चित अभिमानाची बाब आहे. मात्र हे पद माझ्यासाठी सन्मानापेक्षा मोठी जबाबदारी आहे. माझ्यावर विश्वास ठेवून मला ही संधी देणारे संस्थेचे अध्यक्ष आदरणीय केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री खासदार रामदास आठवले साहेब आणि सर्व सन्माननीय विश्वस्त मी त्यांचे मनापासून आभार मानतो, त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला. १९४५ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या सोसायटीचा इतिहास म्हणजे आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचा इतिहास आहे. बाबासाहेबांनी शिक्षणाला समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले त्यामुळे या महान विचारांच्या वारसाची जबाबदारी सांभाळण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी अत्यंत मोठी गोष्ट आहे. माझ्या दृष्टीने शिक्षण म्हणजे केवळ पदवी किंवा नोकरी मिळवणे नव्हे तर शिक्षकांनी शिक्षणातून विद्यार्थ्यांमधील विचार करण्याची क्षमता, आत्मविश्वास, संविधानातलं मूल्य, सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी दिलेली प्रेरणा आहे. विशेषतः आर्थिक दृष्ट्या दुर्बल, वंचित, गरजू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि समान संधी मिळाली पाहिजे. आजच्या बदलत्या काळात पारंपरिक शिक्षण सोबत उच्च तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल शिक्षण, संशोधन, विकास, कौशल्य आणि रोजगार मिळवून देणारे शिक्षण यांना महत्त्व देणे आवश्यक आहे. आपल्या संस्थेतील विद्यार्थी केवळ देशातच नव्हे तर त्यांचा जागतिक स्तरावर नावलौकिक पोहोचला पाहिजे. यासाठी माझा प्रामाणिक प्रयत्न राहणार आहे. संस्था ही एका व्यक्तीमुळे मोठी होत नाही. विश्वस्त, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी पालक आणि समाज यांच्या सामूहिक प्रयत्नातून संस्था घडते त्यामुळे सर्वांना सोबत घेऊन संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता प्रतिष्ठा अधिक उंचावण्याचं काम करण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे असे विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी ऋण व्यक्त करताना सांगितले. स्वागत सुरेश निकाळजे, सूत्रसंचालन अक्षय मोरे आणि आभार अंजना गायकवाड यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वेस्ट टू एनर्जी प्रकल्प चार महिन्यांपासून बंद

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचा मोशी कचरा डेपोतील सुका कचऱ्यापासून वीजनिर्मितीचा (वेस्ट टू एनर्जी) प्रकल्प गेल्या चार महिन्यांपासून बंद आहे. मुदतीमध्ये धुराड्याच्या चिमणीचे काम पूर्ण न केल्याने प्रकल्पाचा ठेकेदार ॲन्टोनी लारा रिन्युएबल एनर्जी प्रा. लि. कंपनीला 1 ऑक्टोबरपासून प्रत्येक दिवसाला 50 हजार रुपये दंड करण्यात सुरुवात करण्यात आली आहे. जोपर्यंत चिमणी उभारून प्रकल्प प्रत्यक्षात सुरू होत नाही, तोपर्यंत हा दंड वसूल केला जाणार आहे. मोशी कचरा डेपोत वेस्ट टू एनर्जी प्रकल्प डीबीओटी तत्वावर जुलै 2023 पासून सुरू करण्यात आला आहे. दररोज सातशे टन सुका कचरा जाळून त्यापासून 14 मेगा वॅट वीज तयार केली जात आहे. प्रकल्पात जाळला जाणाऱ्या कचऱ्यातून धूर निर्माण होऊन निर्माण होणाऱ्या वायू प्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्या प्रकल्पास कारणे दाखवा नोटीस बजावली होती. त्यानंतर धुराड्याची चिमणी 5 जून 2026 ला पाडण्यात आली. तेव्हापासून हा प्रकल्प बंद आहे. त्यानंतर 8 जुलैला कंपनीची अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून 9 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. तर,12 कर्मचारी जखमी झाले. त्या दिवसापासून डेपोत कचरा वाहतूकवाहनांना प्रवेश दिला जात नसल्याने संपूर्ण शहरात कचरा कोंडी निर्माण झाली आहे. या कोंडीतून शहर अद्याप सावरलेले नाही. प्रकल्प तातडीने सुरू करण्याचे आदेश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित ठेकेदारास दिले होते. ठेकेदाराने 30 सप्टेंबरपर्यंत चिमणीचे काम पूर्ण करून 1 ऑक्टोबरपासून प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात येईल, असे सांगितले होते. मात्र, 30 सप्टेंबरपर्यंत ठेकेदाराने चिमणीचे काम पूर्ण केलेले नाही. एकीकडे हा प्रकल्प बंद असल्याने शहरात कचऱ्याची समस्या गंभीर झाली आहे. कचऱ्याच्या समस्येमुळे नागरिक त्रस्त आहेत. सर्वच राजकीय पक्षाच्या नगरसेवकांकडून कचरा समस्या तातडीने सोडवण्याची मागणी केली जात आहे. त्यामुळे आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी ठेकेदारला 1 ऑक्टोबरपासून प्रत्येक दिवसाला 50 हजार रुपये दंड आकारण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाने दंड आकारण्यास सुरुवात केली आहे.

### डेअरी फार्म उड्डाणपूल अंतिम टप्प्यात

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील मिलिटरी डेअरी फार्म येथे पुणे-लोणावळा लोहमार्गावर 65 कोटी 28 लाख खर्चाच्या उड्डाण पुलाचे काम जवळजवळ पूर्ण झाले आहे. संरक्षण विभाग, रेल्वे विभागाच्या परवानग्यासह ठेकेदाराकडून झालेली दिरंगाईत हे काम बरेच महिने अडकले होते. अखेर, काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यामुळे पुल वाहतूक खुला करता येऊ शकतो. मात्र, निवडणूक आचारसंहिता सुरू असल्याने उद्घाटनाचा मुहूर्त लांबणीवर पडला आहे. पुणे-मुंबई जुना महामार्गास पिंपरी कॅम्प, पिंपरीगाव, पिंपळे सौदागर, रहाटणी हा परिसर जोडण्यासाठी हा उड्डाण पूल संरक्षण विभागाच्या जागेत उभारण्यात आला आहे. त्यामुळे पुणे-लोणावळा लोहमार्गाच्या क्रॉसिंगवर थांबण्याची गरज राहणार नाही. तसेच, अवजड वाहनेही या मार्गावरून सुलभपणे ये-जा करू शकतात.

## पंडित हृदयनाथ मंगेशकर यांचा पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने मानपत्र देऊन सन्मान

■ पिंपरी (दै. संध्या)

ज्या मराठी भाषेमध्ये ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ लिहीले गेले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखे राजे होऊन गेले त्या भाषेला अभिजाततेचा वेगळा दर्जा देण्याची गरजच नाही, ती भाषा मुळातच अभिजात आहे. या अभिजात मराठीतील अभिजात काव्याला स्वरबद्ध करण्याचा मी माझ्या परीने प्रयत्न केला. मला जेव्हा असे काव्य सापडत गेले, तेव्हा त्याला चाली देत गेलो. माझ्या बालपणापासूनच आईकडून ऐकलेल्या गोष्टी आणि नंतर तिने वाचून दाखवलेल्या पुस्तकांमधून भाषेचे सौंदर्य माझ्या मनावर संस्कार करत गेले. माझी मोठी बहीण स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर हिच्या आशीर्वादाचा माझ्या संगीतसाधनेत मोठा वाटा आहे. माझी मोठी बहीण शारदा विश्वमोहिनी होती. आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 'अभिजात मराठी भाषा दिवस' आणि 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'च्या निमित्ताने केलेला हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. या सन्मानाबद्दल मी महानगरपालिकेचा




मनःपूर्वक आभारी आहे, असे प्रतिपादन पद्मश्री पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित अभिजात मराठी सन्मान दिन तसेच अभिजात मराठी भाषा सप्ताहाचे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित छायाचित्र प्रदर्शनाचे पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले त्यावेळी मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. याप्रसंगी हृदयनाथ मंगेशकर यांच्या पत्नी भारती मंगेशकर, राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या पार्श्वगायिका सावनी रविंद्र, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, प्रतिनिधी तुषार झरेकर, किशोर बरकुले तसेच महापालिका अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंडित हृदयनाथ मंगेशकर म्हणाले, ज्या भाषेमध्ये ज्ञानेश्वरी लिहिली गेली, ज्या मराठीध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखे राजे होऊन गेले त्या भाषेला अभिजाततेचा दर्जा देण्याची गरजच नाही. ती भाषा मुळातच अभिजात आहे.

## ९ लाख ८६ हजार रुपये किमतीच्या बॅटऱ्या, मोटर्सची चोरी



■ पिंपरी (दै. संध्या)

चिंचवडच्या मोहन नगर परिसरातील एका सर्व्हिस सेंटरमधून सुमारे ९ लाख ८६ हजार रुपयांच्या किमतीच्या दुचाकीच्या बॅटऱ्या व इलेक्ट्रिक मोटर चोरी केल्याप्रकरणी विधीसंघर्षग्रस्त बालक आणि एका भंगार व्यावसायिकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी स्वाती मनीष मोहिते (वय ४६, रा. भक्ती शक्ती अपार्टमेंट, चिंचवड) यांनी फिर्याद दिली आहे.त्यानुसार, डिसेंबर २०२५ पासून ते १६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत मोहननगर, चिंचवड येथील जय मातादी सर्व्हिस सेंटर येथे ही घटना घडली.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या सर्व्हिस सेंटरमध्ये ट्रेनिंगच्या निमित्ताने काम करणाऱ्या एका विधीसंघर्षग्रस्त बालकाने ९ लाख ८६ हजार रुपये किमतीच्या ईव्ही दुचिलरच्या बॅटऱ्या व ईव्ही मोटर चोरून नेल्या. त्यानंतर हा माल चिखलीतील एका भंगार व्यावसायिकास विकले आहे.या प्रकरणी संबंधित विधीसंघर्षग्रस्त बालक तसेच भंगार व्यावसायिकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अद्याप दोन्ही संशयितांना अटक करण्यात आलेली नसून पोलीस पुढील तपास पिंपरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अतिग्रे हे करत आहेत.

# कॉस्टारिका सोसायटीचा सीएसआरमधून झिरो वेस्ट प्रकल्प

■ वाकड (दै. संध्या)

पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाचा संदेश देत वाकड येथील कोस्टारिका को-ऑपरेटिव्ह सोसायटीने 'झिरो वेस्ट इनिशिएटिव्ह' या स्तुत्य उपक्रमाला सुरुवात केली. या उपक्रमाचे उद्घाटन नगरसेवक राहुल कलाटे यांच्या हस्ते करण्यात आले.

सोसायटीतील कचरा व्यवस्थापन अधिक शास्त्रीय, शाश्वत आणि पर्यावरणपूरक पद्धतीने करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमासाठी Mothers Company च्या CSR अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या SORT Program च्या माध्यमातून सहकार्य मिळणार आहे. या उपक्रमाच्या प्रारंभिक टप्प्यात ओला कचरा प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक एरो बिन्स, स्टँड, कोकोपीट तसेच इतर आवश्यक साहित्य व उपकरणे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. तसेच सोसायटीमध्ये कचरा व्यवस्थापनाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना




पुढील तीन महिने कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, प्रक्रिया, देखभाल आणि त्यातून निर्माण होणाऱ्या आउटपुटचे व्यवस्थापन याबाबत प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचे नियमित मॉनिटरिंगही करण्यात येणार आहे.सोसायटीने या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अकरा सदस्यांची स्वतंत्र 'झिरो वेस्ट कमिटी' स्थापन केली आहे. या समितीच्या माध्यमातून सोसायटीतील नागरिकांमध्ये जनजागृती करणे, घराघरांत जाऊन कचरा वर्गीकरणाबाबत माहिती देणे, माहितीपत्रके व फ्लायर्सच्या माध्यमातून जनजागृती करणे तसेच कचरा व्यवस्थापनाच्या विविध टप्प्यांचे निरीक्षण करणे अशी कामे केली जाणार आहेत. सध्या ओला कचरा आणि सुका कचरा यांचे योग्य वर्गीकरण करण्यावर भर देण्यात येत असून, पुढील टप्प्यात बायो-वेस्ट, प्लास्टिक व इतर पुनर्वापरयोग्य कचरा तसेच इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचे स्वतंत्र व्यवस्थापन करण्याचा मानस आहे. यासाठी संबंधित पुनर्वापर संस्थांशी समन्वय साधून सोसायटीच्या पातळीवरच जास्तीत जास्त कचऱ्यावर प्रक्रिया अथवा पुनर्वापर करण्याच्या दिशेने प्रयत्न केले जाणार आहेत. यावेळी बोलताना नगरसेवक राहुल कलाटे म्हणाले, "कचरा व्यवस्थापन ही महापालिकेसह प्रत्येक नागरिक आणि गृहनिर्माण सोसायटीचीही तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. कोस्टारिका सोसायटीने सुरू केलेला हा उपक्रम इतर सोसायट्यांसाठीही प्रेरणादायी ठरू शकतो. कचरा निर्माण होण्याच्या ठिकाणीच त्याचे योग्य वर्गीकरण आणि प्रक्रिया झाली, तर महापालिकेवरील कचरा व्यवस्थापनाचा ताण निश्चितच कमी होण्यास मदत होईल." ते पुढे म्हणाले, "ओल्या कचऱ्यापासून सुरुवात करून टप्प्याटप्प्याने सुका कचरा, प्लास्टिक, पुनर्वापरयोग्य साहित्य आणि ई-कचऱ्याचे व्यवस्थापन सोसायटीच्या पातळीवर करण्याचा हा प्रयत्न आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग, योग्य प्रशिक्षण आणि सातत्यपूर्ण मॉनिटरिंग यांच्या माध्यमातून 'झिरो वेस्ट'च्या दिशेने वाटचाल करणे शक्य आहे."

# एसटीचा 'आवडेल तेथे कोठेही प्रवास' पास आता ऑनलाइन; पर्यटनाचे नियोजन झाले सोपे

■ पिंपरी: (दै. संध्या)

राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाची लोकप्रिय आवडेल तेथे कोठेही प्रवास योजनेचा पास आता ऑनलाइदेखील मिळणार आहे. चार ते सात दिवसांचे हे पास महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध केले आहेत. नागरिकांना कमी खर्चात पर्यटन व धार्मिक स्थळांना जाता यावे, यासाठी १९८८ पासून ही योजना राबविली जाते. साधी बस, शिवशाही आणि ई-बस अशा तीन वर्गांसाठी हे पास उपलब्ध आहेत. याची वैधता पहिल्या दिवशी रात्री बारापासून ते शेवटच्या दिवशी रात्री बारा वाजेपर्यंत असते. पूर्वी हे पास काढण्यासाठी आगारात किंवा बसस्थानकावर जावे लागत असे. या पासच्या कालावधीत प्रवासी महाराष्ट्रात एसटीच्या कोणत्याही (नियोजीत नियंमानुसार लागू असलेल्या) गाड्यांमधून राज्यात कुठेही प्रवास करू शकतात. पर्यटनासाठी किंवा सलग सुट्ट्यांमध्ये फिरण्याचे नियोजन करणाऱ्या कुटुंबीयांसाठी आणि प्रवाशांसाठी ४ ते ७ दिवसांचे पास अत्यंत फिफायतशीर ठरतात. प्रवाशांना हे पास महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर (msrtc.maharashtra.gov.in) काढता येणार आहे. तसेच संकेतस्थळावर ऑनलाइन पास वितरणाची स्वतंत्र्य कार्यप्रणाली (पोर्टल) उपलब्ध आहे. तिथे प्रवासी आपली माहिती भरुन आवश्यक तो कालावधी (४ किंवा ६ दिवस) निवडून आणि ऑनलाइन पेमेंट करुन पास त्वरित मिळविता येणार आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



### विद्यार्थ्यांनी अनुभवली जेंगो सर्कसची रंगत

**नारायणगाव: दैनिक संध्या**

जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा नगदवाडी ता.जुन्नर जि.पुणे येथील इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी नारायणगाव येथे आयोजित 'जेंगो सर्कस'चा मनमुराद आनंद घेतला.अशी माहिती केंद्र शाळेच्या मुख्याध्यापिका उज्ज्वला बोऱ्हाडे यांनी दिली. विद्यार्थ्यांना नेहमीच्या शालेय अभ्यासाबरोबरच मनोरंजनातून विविध अनुभव मिळावेत, त्यांच्यामध्ये कुतूहल, कल्पनाशक्ती व निरीक्षणशक्ती वाढावी या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी या सर्कस भेटीचे आयोजन करण्यात आले होते. सर्कसमधील विविध कसरती, साहसी खेळ,मनोरंजक प्रयोग, विनोदी सादरीकरणे आणि कलाकारांचे कौशल्यपूर्ण प्रदर्शन पाहताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. प्रत्येक सादरीकरणाला विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्तपणे दाद दिली. शाळेबाहेरील अशा आनंददायी व शैक्षणिक अनुभवांमुळे विद्यार्थ्यांना नवनवीन गोष्टी प्रत्यक्ष पाहता व अनुभवता येतात.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. या सर्कस भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंद,उत्साह आणि नवीन अनुभवाची भर पडली. "आजचा दिवस आमच्यासाठी खूप आनंददायी आणि अविस्मरणीय ठरला" अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमासाठी शाळेतील शिक्षक मंगेश मेहेर,पंडित चौगुले,निलेश शेलार,विद्या वाघ,आशा आरेकर,उज्वला कांबळे व स्मिता काळे यांनी नियोजन केले.शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना अशा प्रकारचे विविध अनुभव देण्यासाठी भविष्यातही नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा मानस शिक्षकांनी व्यक्त केला.




### तालुका स्तरावरील ॲथलेटिक्स स्पर्धेत सिया कोकणेची दमदार कामगिरी

**नारायणगाव : दैनिक संध्या**

रेडियन्स इंटरनॅशनल स्कूल, आळेफाटा येथील विद्यार्थिनी कु. सिया शहाजी कोकणे हिने तालुका स्तरावरील ॲथलेटिक्स स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचे नाव उज्ज्वल केले. सियाने 100 मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले, तर 200 मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत रौप्यपदकाची कमाई केली. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे दोन्ही स्पर्धांसाठी तिची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.सियाच्या यशामागे तिची मेहनत, सातत्य आणि जिद्द यासोबतच क्रीडा शिक्षक श्री. गणेश कणसे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी सियाला नियमित सराव व योग्य मार्गदर्शन केले. सियाच्या या यशाबद्दल संस्थेचे संचालक, प्राचार्या, उपप्राचार्य तसेच रेडियन्स इंटरनॅशनल स्कूलमधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. कु. सिया शहाजी कोकणे हिच्या या यशामुळे रेडियन्स इंटरनॅशनल स्कूल,आळेफाटाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. तसेच तिच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी शाळेच्या वतीने तिला शुभेच्छा देण्यात आल्या.




### आरोही कांडगे अबॅकसच्या आंतरराष्ट्रीय परीक्षेत देशात प्रथम

**चाकण : दैनिक संध्या**

आंतरराष्ट्रीय अबॅकस गणित महामंडळ, तैवान व भारत, सारा अबॅकस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या अबॅकसच्या आंतरराष्ट्रीय मूल्यांकन परीक्षेत येथील आरोही किरण कांडगे ही एम दहा कॅटेगरीमधून २५० पैकी २५० गुण मिळवून देशात प्रथम आली आहे. भारत देशातून एक हजार पेक्षा जास्त विद्यार्थी आंतरराष्ट्रीय मूल्यांकन परीक्षेमध्ये सहभागी झाले होते. सारा अबॅकस अकॅडमी, चाकण अबॅकसच्या आंतरराष्ट्रीय मूल्यांकन परीक्षेसाठी ४२ परीक्षार्थी बसले होते. त्यातून आरोही किरण कांडगे या विद्यार्थिनीने शंभर टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने येऊन चाकण शहराचे नाव सर्वत्र झळकविले आहे. आरोही हिने गणिताची ५० उदाहरणं अवघ्या ३ मिनिटांमध्ये सोडवून २५० पैकी २५० गुण मिळवून प्रथम क्रमांकाने येण्याचा मान मिळविला. प्राचार्या पौर्णिमा मोहिते, दयानंद माने, डॉ. अर्चना आघाव व डॉ. प्रवीण आघाव आदींच्या हस्ते आरोही हिचा प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. आरोही ही चाकण येथील उद्योजक किरण कांडगे व रसिका कांडगे यांची रत्नकन्या आहे.

# विद्यार्थ्यांसाठी दंतरोग निदान व उपचार शिबिर

■ कवठे येमाई (दै. संध्या)

मराठी अभिजात भाषा गौरव दिनानिमित्त विद्यालयात विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत दंतरोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये दातांच्या आरोग्याबाबत जनजागृती निर्माण व्हावी आणि दंतरोगांची वेळीच तपासणी व उपचार व्हावेत, या उद्देशाने हे शिबिर घेण्यात आले. या शिबिरामध्ये माननीय डॉ. आकाश उचाळे व माननीय डॉ. संतोष उचाळे यांनी विद्यार्थ्यांना दातांची योग्य पद्धतीने काळजी कशी घ्यावी, दातांची नियमित स्वच्छता कशी राखावी, दातांच्या समस्या निर्माण होण्याची कारणे कोणती तसेच दंतरोग टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

तसेच इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांची दंतरोग तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या दातांची आरोग्यविषयक स्थिती जाणून घेऊन आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. नियमित दात घासणे, योग्य आहार घेणे, अतिप्रमाणात गोड पदार्थांचे सेवन टाळणे आणि दातांमध्ये समस्या जाणवल्यास वेळ न दवडता दंतचिकित्सकांचा सल्ला घेणे, याबाबत डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना दातांच्या आरोग्याचे महत्त्व समजण्यास मदत झाली.

शालेय वयातच आरोग्यदायी सवयी रुजविण्यासाठी अशा आरोग्य शिबिरांचे महत्त्व मोठे असल्याचे यावेळी सांगण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे प्राचार्य माननीय मुंजावडे एस. डी. यांनी डॉक्टर, आयोजक, शिक्षक व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माननीय दाभाडे एस. एस. यांनी केले.

कार्यक्रमाचे व सूत्रसंचालन दाभाडे एस एस यांनी केले यावेळी विद्यालयातील महेंद्र दरवडे, शरद बोंबे,संतोष सोनवणे,मच्छिंद्रनाथ करंजकर,अनिल बाणखेले,हेमा कड्डे, शिल्पा नेहेरे, कामिनी गवळी, सत्यश्री थोरात, उज्वला पवार,सविता धसाडे,दर्शना राजगुरु,धनश्री तावरे,रंभा गांगुर्डे,योगेश गायकवाड,बाळासाहेब साकोरे,तृप्ती पाटील,प्रवीण कोतवाल,भाऊ शिंदे मामा असे सर्व सेवकवृंद, शिक्षक उपस्थित होते. दंतरोग निदान व मार्गदर्शनाच्या या उपक्रमाचे विद्यार्थी, शिक्षक व पालकांकडून कौतुक करण्यात आले.






### डिंभे उजवा कालव्याची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करा; भूसंपादनाचा मोबदला द्या

■ शिरूर (दै. संध्या)

कुकडी प्रकल्पांतर्गत डिंभे उजवा कालव्याची शिरूर तालुक्यातील अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांना सिंचनाचे पाणी उपलब्ध करून द्यावे, तसेच प्रलंबित भूसंपादनाचा मोबदला तातडीने द्यावा, अशी मागणी भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. धर्मेंद्र खांडरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचीही भेट घेऊन निवेदन दिल्याचे खांडरे यांनी सांगितले.

डिंभे उजवा कालवा सुमारे ११६ किलोमीटर लांबीचा असून शिरूर तालुक्यातील विविध गावांतून गोलेगावपर्यंत जातो. कर्डेलवाडी येथील कि.मी. १०५ ते १०६ मधील भरावाचे काम तसेच सरदवाडी येथील सुमारे ४०० मीटर भरावाचे काम अद्याप अपूर्ण आहे. सरदवाडीच्या कामाची निविदाही काढण्यात आलेली नसल्याचे खांडरे यांनी निदर्शनास आणून दिले.

सरदवाडी, बो-हाडे मळा, थापेवाडी, तर्डोबाचीवाडी व गोलेगाव परिसरातील शेतकऱ्यांचा भूसंपादनाचा मोबदला प्रलंबित असून तो तातडीने देण्याची मागणीही करण्यात आली आहे. कुकडी प्रकल्पाचा सुधारित प्रकल्प अहवाल मंजूर करून ही सर्व कामे मार्गी लावावीत, अशी मागणी खांडरे यांनी केली. हे काम पूर्ण झाल्यास शिरूर पंचक्रोशीतील अडीच हजारहून अधिक एकर शेतीला सिंचनाचा लाभ मिळण्याबरोबरच परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मार्गी लागण्यास मदत होणार आहे. माजी आमदार बाबुराव पाचर्णे यांनी या कामासाठी वेळोवेळी अथक प्रयत्न केल्याचेही ॲड. धर्मेंद्र खांडरे यांनी सांगितले.

### शिवरत्न जिवाजी महाले यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन

■ जेजुरी(दै. संध्या)



पुरंदर तालुका नाभिक महामंडळ, सासवड शहर नाभिक संघटना यांच्या वतीने शनिवार दिनांक 10 ऑक्टोबर रोजी शिवरत्न जिवाजी महाले यांच्या 391व्या जयंती. निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे समन्वय समितीचे प्रमुख मुन्ना शिंदे, तालुका अध्यक्ष सुशील गायकवाड यांनी सांगितले.

पुरंदर तालुका नाभिक महामंडळाच्या वतीने दरवर्षी शिवरत्न जिवाजी महाले यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी केली जाते . दिनांक 10 ऑक्टोबर रोजी सासवड येथे होणाऱ्या जयंती कार्यक्रमासाठी केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहळ, उल्हास नगरच्या महापौर अश्विनी निकम, आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप, अशोक टेकवडे, पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ दिगंबर दुर्गाडे , गंगाराम जगदाळे, दौलतनाना शितोळे, तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सदस्य उपस्थित राहणार आहे. यावेळी जिवाजी महाले यांच्या कार्याविषयी शिव व्याख्याते यशवंत गोसावी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाजभूषण पुरस्काराने नाभिक समाजाचे नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते कांता पवार, सुनील पांडे, स्वप्नाली पंडित, सायली शिंदे, अतिश जाधव, प्रशांत जाधव,प्रज्ञा राऊत, पुणे जिल्हा नाभिक युवा महामंडळाचे अध्यक्ष भारत मोरे, तसेच वैशाली पवार, मंगल मगर, किरण काशिद, देवा साळुंखे, अशोक गायकवाड, संतोष विभाड यांना सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच कै विजयबापू राऊत यांच्या स्मरणार्थ समाजभूषण जीवनगौरव पुरस्कार शांताराम घोडके, कैलास बंड, विजय क्षीरसागर, उल्हास क्षीरसागर यांना प्रदान करण्यात येणार असून आदिनाथ गायकवाड व हभप ऋतुजा क्षीरसागर यांचा विशेष सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती समन्वय समितीचे प्रमुख मुन्ना शिंदे, पुरंदर तालुका नाभिक महामंडळाचे अध्यक्ष सुशील गायकवाड, सासवड शहर अध्यक्ष रवींद्र राऊत, जेजुरी शहर अध्यक्ष उमेश गायकवाड, नीरा शहर अध्यक्ष संदीप गायकवाड, मल्हार राऊत, संजय क्षीरसागर, मनोज जगताप, बंटी शिंदे यांनी माहिती दिली.



### दिवेआगर अपघात; मदतीसाठी पदाची नव्हे, माणुसकीची जाणीव

■ आळंदी (दै. संध्या)

दिवेआगर येथे सहलीसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांच्या दुर्दैवी अपघाताची माहिती मिळताच आळंदी नगरपरिषदेचे नुकतेच निवडून आलेले नगरसेवक व जय गणेश प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर उर्फ गोविंदा कुऱ्हाडे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतीचा हात पुढे केला. आपल्या प्रभागातील कोचिंग क्लासमधील विद्यार्थी या दुर्घटनेत सापडल्याची माहिती मिळताच त्यांनी थेट दिवेआगर गाठले.

"ही घटना अत्यंत मन हेलावून टाकणारी आहे. आपल्या आळंदीतील मुलांवर असे संकट ओढवले, हे अत्यंत दुर्दैवी आहे. अशा वेळी राजकारण, पद किंवा इतर कोणताही विचार न करता प्रथम माणुसकीच्या नात्याने मदतीला धावून जाणे ही आपली जबाबदारी आहे. मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांचे दुःख शब्दांत व्यक्त करता येणार नाही. त्यांच्या दुःखात आम्ही सर्व आळंदीकर सहभागी आहोत. उर्वरित विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे घरी पोहोचविण्यासाठी प्रशासनासोबत पूर्ण सहकार्य करण्यात आले ," असे नगरसेवक सागर उर्फ गोविंदा कुऱ्हाडे यांनी सांगितले.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर कुऱ्हाडे यांनी संबंधित पालकांशी संपर्क साधला. त्यानंतर नगरपरिषद अधिकारी व पोलिसांच्या समन्वयाने त्यांनी दिवेआगर येथे पोहोचून परिस्थितीची पाहणी केली. मृत विद्यार्थ्यांचे मृतदेह पालकांच्या ताब्यात देण्याच्या प्रक्रियेत त्यांनी आवश्यक ती मदत केली.

### हवेली - आंबेगाव तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करा : शेतकरी व नागरिकांना दुष्काळी अनुदान द्या

■ कोरेगावमुळ(दै. संध्या)

राज्याच्या अधिकृत मदत व पुनर्वसन व्यवस्थेत दुष्काळ हा अधिसूचित नैसर्गिक आपत्तीचा प्रकार असून, पात्र नुकसानग्रस्तांना शासनाच्या निकषांनुसार मदत दिली जाते. आंबेगाव व हवेली तालुक्यांतील दुष्काळी परिस्थितीची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून महसूल, कृषी व संबंधित यंत्रणांकडून आवश्यक अहवाल मागवावेत. तसेच दोन्ही तालुक्यांचा दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समावेश करण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन बाधित शेतकरी व नागरिकांना शासनाच्या दुष्काळी अनुदान, सवलती व आवश्यक मदतीचा लाभ मिळवून द्यावा, असेही डॉ. अमोल कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

शिरुर लोकसभा मतदारसंघातील आंबेगाव व हवेली तालुक्यांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीची तातडीने प्रत्यक्ष व वस्तुनिष्ठ पाहणी करुन दोन्ही तालुक्यांचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करावा, तसेच बाधित शेतकरी व नागरिकांना दुष्काळी अनुदान, सवलती व आवश्यक शासकीय मदत उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार खरीप हंगाम २०२६ मध्ये ट्रिगर-१ लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध दुष्काळी उपाययोजना व सवलती लागू केल्या आहेत. मात्र, शिरुर लोकसभा मतदारसंघातील आंबेगाव व हवेली तालुक्यांचा या यादीत समावेश झालेला नाही. त्यामुळे या दोन्ही तालुक्यांतील प्रत्यक्ष परिस्थितीचा फेरआढावा घेण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. कोल्हे यांनी निवेदनात नमूद केले आहे. आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, धामणी, शिरदाळे, मांदळेवाडी, वडगावपीर व पहाडदरा या गावांमध्ये अपुऱ्या पर्जन्यमानामुळे खरीप हंगामातील शेतीवर मोठा परिणाम झाला आहे. मोठ्या प्रमाणावर शेती पावसावर अवलंबून असल्याने पावसातील खंडाचा पिकांच्या वाढीवर व उत्पादनावर परिणाम झाला असून शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. त्याचबरोबर पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी व चाऱ्याची उपलब्धता याबाबतही चिंता निर्माण झाली आहे. तसेच हवेली तालुक्यातील थेऊर, लोणीकंद व परिसरातील अनेक गावांमध्ये समाधानकारक पाऊस न झाल्यामुळे खरीप पिके, शेती व स्थानिक पाणी उपलब्धतेवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. त्यामुळे हवेली तालुक्यातीलही प्रत्यक्ष परिस्थितीचा सर्वंकष आढावा घेऊन दुष्काळी निकषांवर वस्तुनिष्ठ विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे. केवळ तालुकास्तरीय सरासरी पर्जन्यमानाचा आधार न घेता पर्जन्यमान, पीकस्थिती, पीकनुकसान, पाणी उपलब्धता, जलस्रोतांची स्थिती तसेच इतर संबंधित निकषांचा गावनिहाय व वस्तुनिष्ठ आढावा घेण्यात यावा, अशी मागणी खासदार डॉ. कोल्हे यांनी केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### चाकण येथे महिलांसाठी फिरते शौचालय सुरू

**चाकण : दैनिक संध्या**


दिवसेंदिवस विस्तारणाऱ्या चाकण शहरात महिलांचा वाढता लोंढा पाहता आणि दररोज भरणारा छोटा, मोठा बाजार याचा सारासार विचार करून बाजारात येणाऱ्या महिला, बालके आणि नागरिकांची स्वच्छतेची गैरसोय लक्षात घेऊन चाकण नगर परिषदेच्या वतीने येथील पीडब्ल्यूडीच्या मैदानावर फिरते शौचालय अर्थात मोबाईल टॉयलेट उपलब्ध करून देण्यात आले आहे. चाकण नगरपरिषदेच्या महिला व बाल कल्याण निधीतून ही सुविधा उभारण्यात आली. बाजारासाठी चाकण शहर व आसपासच्या ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिक, व्यापारी आणि विशेषतः महिला येथे येत असतात. मात्र, योग्य ठिकाणी स्वच्छतागृह उपलब्ध नसल्याने महिलांची मोठी अडचण होत होती. ही बाब लक्षात घेऊन चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी व महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे यांच्या विशेष पुढाकारातून ही सुविधा येथील पीडब्ल्यूडीच्या मैदानावर उपलब्ध करण्यात आली. नगरपरिषदेच्या तातडीच्या या निर्णयामुळे बाजारात येणाऱ्या महिला व नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. फिरत्या शौचालयामुळे शहरात स्वच्छता राखण्यास मदत होणार आहे. महिलांच्या आरोग्य व तातडीच्या सुविधेसाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून आगामी काळातही लोकोपयोगी सुविधा प्राधान्याने पुरवल्या जातील." असे रूपाली कांडगे, नगरसेविका यांनी सांगितले.

### महाराष्ट्राची निर्यातीत भरारी; सहा महिन्यांत आठ टक्के वाढ

**कोल्हापूर : दैनिक संध्या**

जागतिक बाजारातील विविध आव्हानांवर मात करत महाराष्ट्राने चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत निर्यातीत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. जानेवारी ते जून २०२६ या सहा महिन्यांत महाराष्ट्रातून ३ लाख ४१ हजार २९७ कोटी रुपये मूल्याची विविध वस्तूंची निर्यात झाली. या निर्यातीत पारंपरिक दागिने, हिरे व्यवसायासोबतच यंत्रसामग्री, वाहननिर्मिती, विद्युत उपकरणे, औषधनिर्मिती आणि रसायन उद्योगांचा मोठा वाटा राहिला. जानेवारीच्या तुलनेत जूनमध्ये महाराष्ट्राच्या मासिक निर्यातीत सुमारे ८ टक्क्यांची वाढ झाली आहे. म्हणजेच सहा महिन्यांत ४,३२६ कोटी रुपयांनी निर्यात वाढली आहे. वाणिज्य विभागाच्या वस्तूनिहाय आकडेवारीनुसार, महाराष्ट्राच्या निर्यातीमध्ये मौल्यवान धातू, हिरे, मोती आणि दागिने या वस्तूगटाचा सर्वाधिक वाटा राहिला. सहा महिन्यांत या गटातून ६० हजार ५५८ कोटी रुपयांची निर्यात झाली. त्यानंतर यंत्रसामग्री व यांत्रिक उपकरणे ४३ हजार ६९७ कोटी, वाहने व वाहनांचे भाग २९ हजार १८ कोटी, विद्युत यंत्रसामग्री व उपकरणे २६ हजार ९४५ कोटी आणि औषधे व औषधनिर्मिती उत्पादने २४ हजार २६० कोटी रुपयांची निर्यात झाली. या पाच प्रमुख वस्तूगटांचा मिळून महाराष्ट्राच्या सहा महिन्यांच्या निर्यातीत निम्म्याहून अधिक वाटा आहे. रसायने, धातू आणि त्यांच्याशी संबंधित उत्पादनांनीही महाराष्ट्राच्या निर्यातीला मोठा आधार दिला आहे. सेंद्रिय रसायनांची १८ हजार ८३१ कोटी रुपयांची, तर लोखंड, पोलादाची १० हजार ६७२ कोटी आणि त्यापासून तयार वस्तूंची १० हजार ६२० कोटी रुपयांची निर्यात झाली. याशिवाय खनिज इंधने व खनिज तेलांची ८ हजार ८२५ कोटी, तर प्लास्टिक व प्लास्टिक वस्तूंची ६ हजार ९६६ कोटी रुपयांची निर्यात नोंदविण्यात आली. यावरून महाराष्ट्राच्या निर्यातीत केवळ तयार औद्योगिक उत्पादनांचाच नव्हे, तर कच्चा माल, मध्यवर्ती उत्पादने आणि मूल्यवर्धित वस्तूंचाही मोठा वाटा असल्याचे स्पष्ट होते. यंदाच्या वर्षात महाराष्ट्राच्या निर्यातीने चढता कल कायम ठेवला आहे. जानेवारीत ५३ हजार ७७९ कोटी रुपयांपासून सुरू झालेली मासिक निर्यात जूनमध्ये ५८ हजार १०५ कोटी रुपयांवर पोहोचली. या कालावधीत काही महिन्यांत किरकोळ चढ-उतार झाले असले, तरी सहा महिन्यांच्या कालावधीत निर्यातीत एकूण वाढीचा कल दिसून येतो. सहा महिन्यांत निर्यातीचा हा आकडा सुमारे ४ हजार ३२६ कोटी रुपयांनी वाढला असून, जानेवारीच्या तुलनेत जूनमध्ये ८.०४ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली.

### भुदरगडमध्ये सापडली १२व्या शतकातील 'गोरक्षक वीरगळ' शिल्पे



**कोल्हापूर: दैनिक संध्या**

गो-संरक्षणासाठी केलेल्या शौर्याची साक्ष देणारा पुरातन ठेवा कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यात आढळला आहे. कोल्हापूरपासून सुमारे ५० किलोमीटर अंतरावरील नाधवडे या गावातील जोतिबा व मरीआई मंदिर परिसरात मध्ययुगातील अत्यंत दुर्मीळ असे दोन 'गोरक्षक वीरगळ' उजेडात आले आहेत. पेठवडगाव येथील इंदिरा गांधी कॉलेजचे प्राचार्य डॉ. सचिन कोंडेकर आणि महावीर महाविद्यालय इतिहास विभागाचे प्रा. उत्तम वडिंगेकर यांनी या वीरगळांचे संशोधन करून कोल्हापूरच्या मध्ययुगीन इतिहास व तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर प्रकाशझोत टाकला आहे. प्राचीन काळापासून महाराष्ट्र व कर्नाटक भागात विशेष कामगिरी करताना किंवा शत्रूशी लढताना मृत्यू पावलेल्या योद्ध्यांच्या स्मरणार्थ दगडी स्मारके उभारण्याची मोठी परंपरा होती. अतिशय कठीण बेसाल्ट खडकात कोरलेल्या सुबक अशा स्मारकांना 'वीरगळ' म्हटले जाते. वीरगळांचे अनेक प्रकार असले, तरी हल्लेखोर लुटारूंपासून गायी-गुरांचे (गोधन) रक्षण करताना वीरगती प्राप्त झालेल्या योद्ध्यांच्या स्मरणार्थ कोरले गेलेले 'गोरक्षक वीरगळ' अत्यंत दुर्मीळ मानले जातात. मिरज-पंढरपूरसारख्या मैदानी प्रदेशात हे वीरगळ मोठ्या प्रमाणावर आढळतात, परंतु बहुतांश डोंगराळ व जंगली प्रदेश असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यात असे गोधन संरक्षक वीरगळ दुर्मीळ आहेत. कसबा बीड व बारवेनंतर नाधवडे गावात २ गोरक्षक वीरगळ सापडल्याने इतिहास अभ्यासकांसाठी पर्वणी निर्माण झाली आहे. तळाच्या चौकटीत गायींना पळवून नेणाऱ्या आक्रमकांशी ढाल-तलवार घेऊन लढणाऱ्या वीराचे चित्रण आहे. त्याच्याच शेजारच्या वीरगळामध्ये वीराला अप्सरा पालखीतून स्वर्गात नेतानाचे शिल्प आहे. यावरून हा वीर सैन्यातील उच्चपदस्थ असावा असा अंदाज बांधता येतो. गावाच्या उत्तरेस मरीआई मंदिर प्रवेशद्वाराजवळ सापडलेल्या दुसऱ्या वीरगळात गोधन रक्षणासाठी खंजीरासारख्या शस्त्राने लढा देणारा वीर, मृत्यूनंतर त्याला स्वर्गात नेणाऱ्या अप्सरा, सर्वात वरील चौकटीत शिवलोकात महादेवाच्या पिंडीची सपत्नीक पूजा करणारा वीर कोरला आहे. सदरचे वीरगळ शिलाहार राजवट (१२ वे शतक) आणि यादव काळच्या सुरुवातीचे असावेत. शिलाहार काळात भुदरगड व रांगणा किल्ल्यांच्या परिसरातून चालणाऱ्या राजवटींच्या सीमा आणि गोधन संपत्तीसाठी होणारी पळवापळवी यातून अनेक संघर्ष घडत असत. यामुळे या अनमोल वारशाच्या जतन व संवर्धनाची आवश्यकता आहे,असे प्राचार्य डॉ. सचिन कोंडेकर, - प्रा. उत्तम वडिंगेकर, वीरगळ अभ्यासक यांनी सांगितले.

# महामार्गावर अवजड वाहनांचे बेकायदेशीर पार्किंग

■ चाकण (दै. संध्या)

उद्योग पंढरीचे नाक असलेल्या चाकण परिसरात बहुतांशी कंपन्यांच्या बाहेर लोडिंगसाठी येणाऱ्या ट्रक व अवजड वाहने आणि त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना होणारे बेकायदा पार्किंग हे वाहनचालकांसाठी गंभीर समस्या बनली आहे.

प्रशासनाने उद्योग नगरीतील बऱ्याच भागात नो पार्किंगचे फलक लावले असले, तरी त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून ट्रकचालक आपल्या सोयीनुसार रस्त्यावरच वाहने उभी करत आहेत. या बेकायदा पार्किंगमुळे रस्त्याची रुंदी कमी होत असून वाहतुकीचा वेग मंदावू लागला आहे. दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनचालकांना त्यामुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. अपघाताचा धोका वाढला असून, चाकण भागातील बऱ्याच मार्गावर वारंवार वाहतूक कोंडी नित्याची होऊ लागली आहे. वाहतूक समस्या आता नवीन राहिली नसून अनेक दिवसांपासून हा प्रश्न उभा आहे. संबंधित यंत्रणा आणि वाहतूक पोलिसांकडून प्रभावी कारवाई होत नसल्याने नियमांना हरताळ फसले जात आहेत. नो पार्किंगचे फलक केवळ शोभेची वस्तू ठरत असल्याची टीका वाहन चालकांकडून होत आहे.

वाहतूक सुरळीत राहण्यासाठी व संभाव्य अपघात टाळण्यासाठी चालकांनी निष्काळजीपणा टाळला पाहिजे. अवजड वाहने एका ठिकाणी लावण्यासाठी कंपनीच्या व्यवस्थापनाशी समन्वय साधला पाहिजे. चाकण पंचक्रोशीत महामार्गावरील बेकायदा पार्किंग कायमस्वरूपी बंद होणे गरजेचे आहे.

बेकायदा पार्किंगमुळे प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. कामगार व विद्यार्थ्यांचे अतोनात हाल होत असून, सर्वजण बेजार झाले आहे. वाहतुकीला अडथळा ठरणारी अवजड वाहने व्यवस्थित लावण्यासाठी प्रशासनाने रस्त्यातील खड्डे बुजवून ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे, असे बाळासाहेब शिळवणे, उद्योजक, वाघजाईनगर, चाकण यांनी सांगितले.




## दुष्काळात शेतकरी होरपळले; शरद पवारांची दांडी

दुष्काळी परिस्थितीची पाहणी व शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी उपस्थिती नसल्याने तीव्र नाराजी

■ दौंड : (दै. संध्या)

दौंड तालुक्यात शनिवार दिनांक ३ ऑक्टोंबर रोजी देऊळगाव गाडा आणि खोर परिसरातील शेतकरी सध्या दुष्काळाच्या संकटाचा सामना करत असून, आपल्या समस्या मांडण्यासाठी आणि शासनाकडून मदतीची अपेक्षा व्यक्त करण्यासाठी मोठ्या संख्येने एकत्र आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे तसेच शरद पवार या भागाच्या दौऱ्यावर येणार असल्याची माहिती असल्याने शेतकरी व सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे लक्ष या दौऱ्याकडे लागले होते.

दोन्ही ठिकाणी नागरिकांच्या बसण्याची व्यवस्था करण्यासाठी मंडप उभारण्यात आले होते. पवार साहेब शेतकऱ्यांच्या दुष्काळी परिस्थितीबाबत काय भूमिका मांडणार, तसेच शेतकऱ्यांसाठी कोणती मागणी करणार, याकडे उपस्थितांचे लक्ष लागले होते.



मात्र, ऐनवेळी शरद पवार यांचा दौरा रद्द झाल्याने उपस्थित शेतकरी व कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले. पवार साहेब येणार असल्याने आपल्या अडचणींचा आवाज ते शासन दरबारी पोहोचवतील आणि काहीतरी मदत मिळण्याची अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र ते उपस्थित राहू न शकल्याने अनेक शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. विशेष म्हणजे परिसरात सत्ताधारी भारतीय जनता पक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे राजकीय अस्तित्व असतानाही दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याची भावना काही उपस्थितांनी व्यक्त केली. दरम्यान, खासदार सुप्रिया सुळे यांचा कार्यक्रम इंदापूरकडे वळविण्यात आल्याची माहिती समोर आली. त्यामुळे दौंड तालुक्यातील देऊळगाव गाडा व खोर परिसरातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा मात्र अपूर्ण राहिल्या. पवार साहेब दौऱ्यावर का आले नाहीत, याबाबत शेतकऱ्यांमध्ये चर्चा सुरू असून, दुष्काळग्रस्त भागातील प्रश्नांकडे आगामी काळात कोण लक्ष देणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, अशी अपेक्षा परिसरातील शेतकरी बांधवांनी व्यक्त केली.

## धावपट्टी पहिल्या टप्प्यात २ हजार ३००, दुसऱ्या टप्प्यामध्ये ३ हजार मीटर होणार

■ कोल्हापूर : (दै. संध्या)

कोल्हापूर विमानतळाची धावपट्टी पहिल्या टप्प्यात २३०० मीटर आणि दुसऱ्या टप्प्यात ३ हजार मीटर करण्याचा निर्णय शनिवारी घेण्यात आला. या धावपट्टीसाठी ६४ एकर भूसंपादन झाल्याने विस्तारीकरणाला गती देण्याचा निर्णय केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यात पुण्यात झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

विकासाशी संबंधित तांत्रिक आणि प्रशासकीय प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याबाबत या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. वैमानिक प्रशिक्षण केंद्र उभारणीच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी पुढील आठवड्यात कोल्हापूर विमानतळावर सुरक्षितता मूल्यांकनाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या संबंधित विभागांची मान्यता घेण्यात येणार असून, त्यानंतर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाची आवश्यक मान्यता मिळविण्यासाठी पाठपुरावा करू, असे आबिटकर यांनी सांगितले. या मान्यता मिळाल्यानंतर प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करता येणार आहे.

या केंद्रासाठी विमानांच्या हालचालींचा मार्ग तसेच विमाने उभी करण्याचे क्षेत्र आणि विमान ठेवण्यासाठीचे दुरुस्ती गृह या कामांची स्वतंत्रपणे प्रक्रिया केली जाणार आहे. केंद्राचे प्रस्तावित ठिकाण विमानतळाच्या तामगावच्या बाजूस असल्याने तेथे स्वतंत्र सुरक्षा प्रवेश व्यवस्था उभारावे लागेल. या प्रवेशद्वारासाठी क्ष-किरण तपासणी यंत्रासह सुरक्षा व्यवस्था, पोलीस तैनात करावे लागतील. या केंद्राच्या पायाभूत सुविधांसाठी २५ गुंठे जागा प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव विमानतळ प्राधिकरणाच्या मुख्यालयात मान्यतेसाठी सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## शिरढोणच्या नदीकाठावर केबल चोरांचा धुमाकूळ, शेतकऱ्यांमध्ये चिंता

■ शिरढोण : (दै. संध्या)

नदीकाठच्या शेतांमध्ये सिंचनासाठी टाकण्यात आलेल्या केबल वायर चोरीला जाण्याचे प्रकार वाढले आहेत. आतापर्यंत १० हून अधिक शेतकऱ्यांच्या शेतातील केबल वायर चोरीला गेल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. शेतीच्या सिंचनासाठी नदीकाठावर टाकण्यात आलेल्या केबल वायर रात्रीच्या वेळी चोरट्यांकडून लक्ष्य केल्या जात आहेत.

यापूर्वीही या परिसरात अशा घटना घडल्या असून, शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे. चोरी झाल्यानंतर नवीन केबल वायर खरेदी करून पुन्हा व्यवस्था करावी लागत असल्याने अतिरिक्त खर्चाचा भार शेतकऱ्यांवर पडत आहे.

नदीकाठच्या भागात रात्री वर्दळ कमी असल्याने चोरट्यांना संधी मिळत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे कुरुंदवाड पोलिसांनी घटनांची चौकशी करून चोरट्यांचा शोध घ्यावा, तसेच नदीकाठच्या परिसरात रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

नदीकाठच्या शेतांमध्ये रात्रीच्या वेळी शेतकरी नसल्याचा फायदा घेत केबल वायर चोरीच्या घटना घडत आहेत. वारंवार चोरी होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

चोरी रोखण्यासाठी नदीकाठच्या भागात पोलिसांनी नियमित रात्रीची गस्त घालावी. संशयास्पद व्यक्ती व वाहनांची तपासणी करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

## चाकण बाजारात फळभाज्या व पालेभाज्या महागल्या

■ चाकण : (दै. संध्या)

पितृपंधरवड्यामुळे खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये फळभाज्या व पालेभाज्या महागल्या आहेत. पालेभाज्यांची भरपूर आवक होऊनही भाव तेजीत राहिले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी ९५ लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ९०० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,६०० ते ४,६५० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,७५० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव ८०० ते १,८०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ७० क्विंटल झाली. लसणाला कमाल भाव १८ हजार रुपये मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक २५५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयां पासून ते ५ हजार रुपयांपर्यंत कमाल भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा - एकूण आवक - ९०० क्विंटल. भाव क्रमांक - १. ४,६५० रुपये, भाव क्रमांक २. ३,६०० रुपये, भाव क्रमांक ३. १,६०० रू. बटाटा - एकूण आवक - १,७५० क्विंटल.भाव क्रमांक १. १,८०० रुपये, भाव क्रमांक २.१,००० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये.



फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - ४१३ क्विंटल (१,००० ते २,००० रू.), कोबी - ३३५ क्विंटल (४०० ते ६०० रू.), फ्लॉवर - २१० क्विंटल (१,००० ते १,८०० रु.), वांगी - ९२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), भेंडी - १६६ क्विंटल (२,५०० ते ४,५०० रु.), दोडका - ६२ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), कारली - ८४ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ५२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ८५ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), फरशी - २६ क्विंटल (३,००० ते ४,५०० रु.), वालवड - ५२ क्विंटल (३,००० ते ५,००० रुपये), ढोबळी मिरची - ११४ क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.), चवळी - ३२ क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.), शेवगा - ३० क्विंटल (४,००० ते ६,००० रु.), गाजर - १८० क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गवार - ५६ क्विंटल (३,००० ते ७,००० रु. ), आले - १५२ क्विंटल (७,००० ते १३,००० रु. ), वाटाणा - ४० क्विंटल (६,००० ते ९,००० रु.), भुईमूग शेंगा - १०५ क्विंटल (४,५०० ते ५,५०० रु.)..


## Gen Z च्या मनातला 'संताप' रॅपर विषय (Vishay Khxl) ने रॅपमधून व्यक्त केला

■ मुंबई (दै. संध्या)

आजच्या Gen Z पिढीच्या मनात असलेले प्रश्न, अस्वस्थता आणि सामाजिक वास्तवावरचा आक्रोश रॅपच्या माध्यमातून व्यक्त करणारा रॅपर विषय खोल (Vishay Khxl) सध्या चर्चेत आहे. त्याचे 'संताप' हे गाणे सोशल मीडियावर ट्रेंडिंग असून, शिक्षणव्यवस्था, विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि अन्यायाविरोधात आवाज उठवण्याचा संदेश या रॅपमधून देण्यात आला आहे. तरुणाईच्या मनातील भावना थेट आणि परखड शब्दांत मांडल्यामुळे या गाण्याला सोशल मीडियावर चांगला प्रतिसाद मिळत आहे.

विषयच्या संगीतप्रवासामागे एमिनेमचा मोठा प्रभाव आहे. आपल्या पहिल्या फोनमध्ये फक्त एमिनेमची गाणी असल्याचे सांगताना तो म्हणतो की, "माझ्या लिखाणात, रॅपिंग सेन्समध्ये, म्युझिक सेन्समध्ये, फ्लोज आणि केडन्समध्ये एमिनेमने मला खूप प्रेरणा दिली." मात्र त्याचा प्रवास थेट रॅपर म्हणून सुरू झालेला नाही. "मी आधी म्युझिक प्रोड्युसर आहे आणि नंतर रॅपर," असे तो सांगतो. बीट्स तयार करण्यापासून त्याने संगीताची सुरुवात केली. विशेष म्हणजे संगीताशी कोणताही संबंध नसलेल्या मित्राकडे MPC किट असल्याचे त्याला एकदा स्वप्नात दिसले. त्या स्वप्नातील अनुभवातून त्याला बीट मेकिंगची उत्सुकता निर्माण झाली आणि पुढे म्युझिक प्रोडक्शनमधून त्याचा रॅपकडे प्रवास सुरू झाला."

'संताप' या गाण्यामागे मात्र केवळ संगीताची प्रेरणा नसून सामाजिक परिस्थिती विषयीचा तीव्र आक्रोश आहे. जंतरमंतर येथे विद्यार्थ्यांनी चांगल्या शिक्षणव्यवस्थेसाठी केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीने विषय अस्वस्थ झाला. देशाचे भवितव्य असलेल्या विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे होणारे दुर्लक्ष, आंदोलनादरम्यान झालेला



अन्याय आणि महिला विद्यार्थिनींच्या झालेल्या अपमानाच्या घटनांनी त्याच्या मनात निर्माण झालेला संताप त्याने रॅपच्या माध्यमातून व्यक्त केला आहे. या संपूर्ण अनुभवातून 'संताप' या गाण्याची निर्मिती झाली. "आपल्या आजूबाजूला चुकीच्या गोष्टी आणि अन्याय घडत असताना आपण अनेकदा त्याकडे दुर्लक्ष करतो. जिथे चुकीचं दिसतं, जिथे अन्याय दिसतो, तिथे आवाज उठवला पाहिजे. कारण त्याशिवाय आपल्या देशाचा विकास होणार नाही," असा स्पष्ट संदेश रॅपर विषय (Vishay Khxl) देतो. त्यामुळे 'संताप' हे केवळ एक रॅप साँग न राहता Gen Z च्या प्रश्नांना, अस्वस्थतेला आणि सामाजिक जाणीवेला आवाज देणारा ट्रॅक ठरत आहे.


सोशल मीडियावर मिळणारा प्रतिसाद पाहता विषय (Vishay Khxl) च्या या परखड रॅपची चर्चा आगामी काळात आणखी रंगण्याची शक्यता आहे.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
सोमवार, दि. ०५ ऑक्टोबर २०२६



www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



# भाजप युवा मोर्चाचा जेजुरीत‘युवा निर्धार मेळावा

## युवाशक्तीच्या बळावर संघटन मजबूत करण्याचे आवाहन : आमदार गोपीचंद पडळकर

■ जेजुरी (दै. संध्या)

भाजपची संघटनात्मक विचारधारा आणि कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वाला मिळणाऱ्या संधीवर भाष्य केले. “भारतीय जनता पार्टी ही घराणेशाहीवर नव्हे, तर कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवणारी संघटना आहे. सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याला पक्षातील सर्वोच्च जबाबदारीपासून देशाच्या नेतृत्वापर्यंत पोहोचण्याची संधी भाजपमध्ये मिळते, यासाठी युवाशक्तीच्या बळावर संघटन मजबूत करण्याचे आवाहन आमदार गोपीचंद पडळकर यांनी बोलताना केले. भारतीय जनता युवा मोर्चा, पुणे ग्रामीणच्या वतीने जेजुरी येथे आयोजित करण्यात आलेल्या ‘युवा निर्धार मेळाव्याला शेकडो तरुणांनी उपस्थिती लावत भाजप युवा मोर्चाचे जोरदार शक्तिप्रदर्शन केले. युवा प्रश्न, रोजगार, शिक्षण, कौशल्य विकास, शासकीय योजना आणि संघटनात्मक विस्तार या विविध विषयांवर यावेळी युवा कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यात आला.

२०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात झालेल्या विकासकामांचा उल्लेख करताना विमानतळांची वाढ, वैद्यकीय शिक्षणाचा विस्तार तसेच सामान्य आणि बहुजन समाजातील तरुणांना शिक्षण, कौशल्य आणि विविध संधींच्या माध्यमातून पुढे जाण्यासाठी निर्माण झालेल्या संधींबाबतही आमदार पडळकर यांनी युवा कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

युवा मोर्चा पुणे ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष वैभव सोलनकर यांनी यावेळी आमदार रोहित पवार यांच्यावर जोरदार टीका केली. “तरुणांच्या प्रश्नांना योग्य दिशा देण्याऐवजी




तरुण पोरांची माथी भडकवण्याचे काम केले जात आहे. युवकांना भडकावण्यापेक्षा त्यांच्या हाताला रोजगार, शिक्षण आणि कौशल्याची ताकद देण्याची गरज आहे,” असा घणाघाती आरोप सोलनकर यांनी केला.

भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडीक यांनी तरुणांच्या रोजगाराच्या प्रश्नावर विशेष भर दिला. “तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात, यासाठी शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती युवकांपर्यंत पोहोचवली पाहिजे. केवळ योजना तयार होणे पुरेसे नाही, तर त्या योजनांचा लाभ शेवटच्या तरुणापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांनी घेतली पाहिजे असे सांगितले.

यावेळी आमदार गोपीचंद पडळकर, भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडीक, भाजप पुणे ग्रामीणचे प्रभारी सदाशिव खाडे, आमदार संजय जगताप, भाजप पुणे जिल्हा दक्षिण ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष शेखर वढणे, भाजप युवा मोर्चा पुणे जिल्हा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष वैभव सोलणकर,भाजप सरचिटणीस बाळासाहेब गरुड,वैशाली सणस,अविनाश मोठे,पांडुरंग कचरे,भाजप नेते खलिल काजी,गोविंद देवकते,युवा मोर्चा महामंत्री स्वप्नील मोडक,युवती अध्यक्ष रसिका सणस,भाजप व युवा मोर्चाचे विविध पदाधिकारी,मंडल पदाधिकारी युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### शिवनेरी किल्ल्यावर ‘स्वच्छ भारत से स्वस्थ भारत’ अभियान उत्साहात

**जुन्नर : दैनिक संध्या**

महात्मा गांधी जयंतीनिमित्त शिवजन्मभूमी किल्ले शिवनेरी येथे २ ऑक्टोबर रोजी ‘स्वच्छ भारत से स्वस्थ भारत अभियान’ उत्साहात पार पडले. ३६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी पुणे, भारतीय पुरातत्त्व विभाग जुन्नर उपमंडळ आणि श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने या स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाचे मेजर जनरल विवेक त्यागी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. शिवनेरी किल्ल्यावर राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने प्रथमच मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या अभियानात जुन्नर व आंबेगाव तालुक्यातील विविध विद्यालये व महाविद्यालयांतील सुमारे ७०० एनसीसी कॅडेट्सनी सहभाग घेत किल्ला परिसराची स्वच्छता केली. यावेळी एनसीसी गट मुख्यालय पुणेचे कमांडर ब्रिगेडियर एस.पी.एस. रौतेला, ३६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी पुणेचे कमांडिंग ऑफिसर कर्नल निषाद मंगरूळकर, श्री शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव वाघमारे आणि एनसीसी विभाग प्रमुख कॅप्टन डॉ. बाबासाहेब माने आदी उपस्थित होते. मेजर जनरल विवेक त्यागी यांनी छात्र सैनिकांना मार्गदर्शन करताना स्वच्छता, आरोग्य आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले. नशामुक्त जीवन जगणे, स्वतः निरोगी राहणे आणि देशाला समृद्ध करण्यासाठी योगदान देणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. एनसीसी कॅडेट्स हे देशाचे भविष्य असून, त्यांना योग्य दिशा आणि संस्कार मिळाल्यास भविष्यातील भारत अधिक सुरक्षित व समृद्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय छात्र सेनेच्या आधुनिकीकरणाबाबत माहिती देताना त्यांनी सायबर सुरक्षा, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ड्रोन टेक्नॉलॉजी, आपत्ती व्यवस्थापन, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकास यांसारख्या आधुनिक विषयांचे प्रशिक्षण कॅडेट्सना देण्यासाठी विविध ठिकाणी प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येत असल्याचे सांगितले. महाराष्ट्रभर या प्रशिक्षण केंद्रांचा विस्तार करण्यासाठी राज्य सरकारकडूनही सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शिवनेरी किल्ल्यावर आयोजित करण्यात आलेल्या या स्वच्छता अभियानाचे मेजर जनरल विवेक त्यागी यांनी कौतुक केले. मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या एनसीसी कॅडेट्सनी स्वच्छतेचा संदेश देत ‘स्वच्छ भारत, स्वस्थ भारत’ या संकल्पनेला कृतीतून बळ दिले.

### वसुलीसोबत वीजपुरवठ्याची गुणवत्ता सुधारा – दिनेश अग्रवाल

**पुणे: दैनिक संध्या**

वारंवार इशारा देऊनही २०५ कोटींची थकबाकी शिल्लक राहिल्याबद्दल नाराजी व्यक्त करत, ही थकबाकी ऑक्टोबर महिन्यात कोणत्याही परिस्थितीत वसूल करा, तसेच वीजपुरवठ्याची गुणवत्ता सुधारा, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जा, असा इशारा महावितरणचे कार्यकारी संचालक (वाणिज्य) दिनेश अग्रवाल यांनी पुण्यातील अधिकाऱ्यांना दिला. पालक संचालक म्हणून अग्रवाल दर आठवड्याला पुणे परिमंडलाचा आढावा घेतात. शनिवारी (दि. ३) दुपारी झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी वीजबिल वसुली, वीजपुरवठा, सेवा सेतू व सेवा संकल्प अभियान आदींचा उपविभागनिहाय आढावा घेतला. या बैठकीला प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर, अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, सुरेश सवाईराम, सहायक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) कीर्ती भोसले यांच्यासह पुणे परिमंडलातील सर्व विभागांचे कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते व अधिकारी उपस्थित होते. अग्रवाल म्हणाले, “सप्टेंबर महिन्याअखेर २०५ कोटी ८७ लाख रुपयांची थकबाकी शिल्लक आहे. पुण्यासाठी ही चांगली बाब नाही. ऑक्टोबर महिन्याच्या चालू बिलासोबत ही थकबाकी वसूल करा. पुढच्या शनिवारपर्यंत ही थकबाकी वसूल झालेली असावी. ऑक्टोबर हिटला सुरुवात झाली आहे. त्यामुळे वीजपुरवठ्याकडेही सर्वांनी लक्ष द्यावे. आपापल्या कार्यक्षेत्रातील वीजपुरवठा अखंडितपणे सुरू राहील यासाठी प्रत्येकाने दक्षता घ्यावी, तसेच वीजगळती रोखून महावितरणचा महसूल वाढवावा.” सेवा सेतू आणि सेवा संकल्प अभियानाबाबतही सर्वांनी सजग राहण्याचे आवाहन करताना जास्तीत जास्त किऑस्क उभारून ग्राहकांना महावितरणच्या सेवांचा लाभ द्यावा, असे अग्रवाल यांनी सांगितले.

### दहिगावचा ‘कृषी केंद्राचा पुरस्काराने’ सन्मान

**शेवगाव : दैनिक संध्या**

तालुक्यातील दहिगावने येथील श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या कृषी विज्ञान केंद्राला उत्कृष्ट कार्य कृषी विज्ञान केंद्र पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराबद्दल केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. श्यामसुंदर कौशिक यांचा सत्कार माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. दहिगावने येथील कृषी विज्ञान केंद्राचे कामकाज अध्यक्ष माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले पाटील, माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील तसेच संस्थेच्या विश्वस्त मंडळाच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी पद्धतीने सुरू आहे. भारतीय कृषी अनुसंधान परिषद अंतर्गत अटारी, झोन-८ यांच्या वतीने महाराष्ट्र, गुजरात व गोवा या राज्यांतील एकूण ८२ कृषी विज्ञान केंद्रांचा नववी वार्षिक विभागीय कार्यशाळा नुकतीच आय. सी. ए. आर. अटारी (जि. पुणे) येथे राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेदरम्यान दहिगावने येथील कृषी विज्ञान केंद्रास २०२५ मधील उत्कृष्ट कार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## श्री येमाई देवी शारदीय नवरात्र महोत्सव होणार उत्साहात

■ कवठे येमाई (दै. संध्या)

महाराष्ट्राचे आराध्य दैवत व कवठे येमाई ग्रामदैवत श्री येमाई देवी शारदीय नवरात्र महोत्सव यंदा मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. अश्विन शु. १ रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ ते विजयादशमी दि. २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक व भजन-कीर्तन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त दररोज सकाळी सप्तशती वाचन, गोंधळी आरती, महापूजा, तसेच सायंकाळी सप्तशती वाचन, आरती, पूजा, नैवेद्य व गोंधळ असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.या कालावधीत विविध भजनी मंडळे, आराधी संगीत पार्टी तसेच धार्मिक संस्थांच्या सहभागातून भजन, देवीची गाणी, होमहवन व संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. शिरूर, कवठे येमाई, आंबेगाव, राजगुरुनगर, जुन्नर, अहिल्यानगर आदी परिसरातील भाविक व कलाकार या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. नवरात्रोत्सवात होमहवनाचा विशेष



धार्मिक कार्यक्रम रात्री आयोजित करण्यात आला असून, विजयादशमीच्या दिवशी श्री येमाई माता महापूजा, देवीची गाणी आणि सीमोल्लंघनासाठी पालखी प्रस्थान होणार आहे. जुन्या येमाई माता मंदिरासमोर सीमोल्लंघन पालखीची प्रदक्षिणा करून मंदिरात प्रवेशाचा पारंपरिक सोहळा पार पडणार आहे. श्री येमाई देवी संस्थान व ग्रामस्थांच्या सहकार्याने मंदिर परिसरात विविध विकासकामे करण्यात आली आहेत. यामध्ये श्री महागणपती मंदिर, श्री पुंजाबा मंदिर, तुळशी वृंदावन, जाळी कंपाऊंड, महिला व पुरुष प्रसाधनगृह, भक्तिनिवास, दर्शनबारी व शेड, पडवी नूतनीकरण, दक्षिणमुखी मारुती मंदिर नूतनीकरण, मंदिर रंगकाम, पेव्हिंग ब्लॉक, पालखी कक्ष, कार्यालय, वृक्षलागवड, सभामंडप, स्टील ग्रील, फरशी व पत्राशेड आदी कामांचा समावेश आहे.मंदिर व परिसराच्या सुशोभीकरणासाठी झालेल्या या विविध कामांना भाविक व ग्रामस्थांचे सहकार्य लाभले असून, श्री येमाई देवी संस्थानने सर्व सहकार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत. नवरात्रोत्सवातील सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी कवठे येमाई व परिसरातील तसेच महाराष्ट्रातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री येमाई देवी संस्थान व समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## राजगड तालुक्यातील बहुतांशी भात खाचरे कोरडी, शेतकरी चिंतेत

■ वेल्हे (दै. संध्या)

भात पिकाचे आगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजगड तालुक्यातील बहुतांशी शेतकऱ्यांची भात शेती पावसाअभावी कोरडी पडली असून पावसाळ्यात सुरू झालेल्या नैसर्गिक पाण्याचे प्रवाह बंद झाल्याने भात पीक अखेरच्या घटका मोजत आहेत. राज्य शासनाने दुष्काळी तालुक्यामध्ये राजगड तालुक्याचा समावेश केल्यानंतर भोर विभागाचे उपविभागीय अधिकारी डॉ. विकास खरात, राजगड तालुक्याचे तहसीलदार ढाणे, यांच्यासह पथकातील कर्मचाऱ्यांनी विविध गावात जाऊन शेतकऱ्यांच्या ती पाहणी केली आहे. प्रशासनाच्या वतीने तलाठी, ग्रामसेवक व महसूल सहाय्यक यांच्या वतीने संयुक्त पंचनामे करण्याची मोहीम युद्ध पातळीवर सुरू असल्याची माहिती राजगड तालुक्याचे तहसीलदार निवास ढाणे यांनी दिली. राजगड तालुक्यात सुमारे अडीच हजार मिलिमीटर पाऊस हा चार महिन्यात टप्प्याटप्प्याने पडत असतो यामुळे येथील भागातील शेतजमीन ही नैसर्गिक रित्या भात पिकास अनुकूल असल्याने बहुतांशी शेतकरी ही भातशेती करतात. सुमारे पाच हजाराहून अधिक हेक्टर वर भात शेती केली जाते तर दोन हजार हेक्टर वर नाचणीचे लागवड केली जाते. मात्र यंदा टप्प्याटप्प्याने न पडलेला पाऊस हा फक्त जुलै आणि ऑगस्ट या महिन्यात पडला तर भात पोसण्याचा कालावधी असलेल्या सप्टेंबर महिन्यात पाऊस गायब झाल्याने भात शेती धोक्यात आली आहे. याबाबत राजगड तालुक्याचे तहसीलदार म्हणाले, "राजगड तालुक्याचा राज्य सरकारने ट्रिगर वन मध्ये दुष्काळी तालुका म्हणून समावेश केला असल्याने 75 कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून रविवार (ता.०४) रोजी 127 गावातील 73400 गटांपैकी 19800 गटांची प्राथमिक पिक पाहणी पूर्ण करण्यात आली.

## विष्णू माने लिखित जिजाऊंचे बाळकडू’ पुस्तकाचे प्रकाशन

■ चिंचवड (दै. संध्या)

गर्भसंस्कार ही काळाची गरज असून गर्भसंस्काराच्या माध्यमातून भावी पिढीच्या जडणघडणीला सकारात्मक दिशा देता येते, गर्भसंस्कारातून सशक्त पिढी घडेल,असा विश्वास आमदार उमा खापरे यांनी व्यक्त केला. डॉ. विष्णू माने लिखित ‘जिजाऊंचे बाळकडू’ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा चिंचवड येथील एलप्रो सभागृहामध्ये उत्साहात पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद म. खंडागळे , विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, गायक अवधूत गांधी टाटा मोटर्स चे माजी फाउंड्री प्रमुख संभाजी पवार, डॉ. सुरेंद्र पाटील,माजी नगरसेवक अनंत कोऱ्हाळे, कामगार नेते प्रशांत पोमन, आकाश गोंदवले, राज अंतुर्लीकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार खापरे म्हणाल्या की, “गर्भसंस्कार ही आजच्या काळाची गरज आहे. गर्भावस्थेपासूनच बाळाच्या सर्वांगीण विकासासाठी



सकारात्मक विचार, संस्कार आणि पोषक वातावरण निर्माण करणे महत्त्वाचे आहे.” भाऊसाहेब भोईर यांनीही गर्भसंस्काराच्या माध्यमातून सुसंस्कारित आणि सक्षम पिढी घडविणे शक्य असल्याचे सांगितले. गर्भसंस्काराबाबत समाजामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. ‘जिजाऊंचे बाळकडू’ या पुस्तकातून गर्भसंस्कार, मातृत्व, संस्कार आणि भावी पिढीच्या जडणघडणीविषयी विचार मांडण्यात आले आहेत. जिजाऊ माँसाहेबांच्या संस्कारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पालकत्वाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न या पुस्तकातून करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. विष्णू माने यांच्या टीमने केले. कार्यक्रमाचे निवेदन स्वाती बालटे यांनी केले.

## अक्षरसृष्टी संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांना विमानाद्वारे मोफत सहल

■ जेजुरी (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील अक्षरसृष्टी संस्थेच्या वतीने सलग पंधराव्या वर्षी वर्षी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विमानाद्वारे मोफत सहलींचे आयोजन करण्यात आले होते.नुकतेच हैद्राबाद येथे विमानाने 81 विद्यार्थी या सहलीत सहभागी झाले होते.

पुरंदरमधील डोंगर भागातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची मोफत विमान प्रवासाद्वारे हैदराबाद तेलंगणा येथे तीन दिवसासाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

या सहलीमध्ये मेट्रोद्वारे शहराची सफर, गोवळकोंडा किल्ला, लाईट शो, म्युझियम, रामोजी फिल्म सिटी, चारमिनार व इतर महत्त्वाची ठिकाणे विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. ग्रामीण भागातील जे विद्यार्थी कधीही रेल्वे, विमानात बसले नाहीत किंवा मोठ्या शहरात गेलेले नाहीत अशा सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील, वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी मान्यवर संस्थांच्या सहकार्यातून या सहली आयोजित करण्यात येतात.

संस्थेच्या वतीने दरवर्षी जयपूर, हैदराबाद, बेंगलोर, गुजरात, दिल्ली, केरळ, तेलंगणा तसेच महाराष्ट्रातील



अनेक महत्त्वाची शहरे व गड किल्ल्यावर सहली आयोजित करण्यात येतात. दरवर्षी महाराष्ट्रात व महाराष्ट्र बाहेर जवळ जवळ दोन हजार ग्रामीण विद्यार्थ्यांना विविध संस्थांच्या सहकार्यातून तालुक्यातील प्रमुख ठिकाणे, राज्यातील गड किल्ल्यांचे दर्शन,या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या सहलीसाठी रियाज सय्यद, चंद्रकांत चौडकर, मुख्याध्यापिका लता बोकड, विपुल भगत,महेश कोलते, पालकांनी सहकार्य केले. अक्षरसृष्टी संस्थेचे अध्यक्ष सिद्धनाथ पवार याप्रसंगी म्हणाले की दुर्गम भागातील वंचित घटकातील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना भारताचा गौरवशाली इतिहास व आधुनिक भारताचे ज्ञान होण्यासाठी या शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात येते.विविध संस्थांच्या सहकार्यातून या सहली आयोजित केल्या जातात. दिवाळीमध्ये गुजरात, सायन्स सिटी येथे विमानाद्वारे सहलीचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

## शेतकऱ्याच्या घरातही उजळणार दिवाळी; ‘सानिध्य’ची मायेची पणती

■ नाझरे सुपे पुरंदर (दै. संध्या)

दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या घरातही यंदा दिवाळीचा दिवा उजळावा, यासाठी ‘सानिध्य फाऊंडेशन’ने ‘एक दिवा जगाच्या पोशिंद्यासाठी’ हा उपक्रम हाती घेतला आहे. ५ ते २० ऑक्टोबरदरम्यान धान्य, नवीन कपडे, शालेय साहित्य, श्रमदान आणि आर्थिक मदतीचे संकलन करून गरजू शेतकरी कुटुंबांना आधार देण्यात येणार आहे.

सौ. प्रतिमा प्रकाश जगताप यांनी गेल्या २० वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात विविध माध्यमातून कार्य केले आहे. याच सामाजिक बांधिलकीतून त्यांनी नुकतीच ‘सानिध्य फाऊंडेशन’ची सुरुवात केली असून, संस्थेचा पहिला सामाजिक उपक्रम म्हणून ‘एक दिवा जगाच्या पोशिंद्यासाठी’ हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील अनेक भागांत दुष्काळाचे संकट असून, त्याचा मोठा फटका शेतकरी कुटुंबांना बसत आहे. शेती, रोजगार आणि उत्पन्नाच्या अडचणींमुळे अनेक कुटुंबांसाठी सणासुदीचा आनंदही आर्थिक विवंचनेत हरवून जातो. शासनाकडून विविध उपाययोजना केल्या




जात असल्या तरी समाजातील प्रत्येक घटकानेही शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे.

दिवाळी हा प्रकाशाचा आणि आनंदाचा सण आहे. या दिवाळीत शेतकरी कुटुंबांच्या घरातही आनंदाचा दिवा पेटावा, त्यांच्या मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे आणि संकटाच्या काळात समाज आपल्यासोबत ठामपणे उभा आहे, हा विश्वास त्यांना मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविला जात आहे.

या उपक्रमासाठी नागरिकांनी आपल्या इच्छेनुसार गहू, तांदूळ, खाद्यतेल, गूळ, साखर, डाळी आणि रवा यांसारखे धान्य व किराणा साहित्य देऊन सहकार्य करता येईल. तसेच नवीन साड्या, पॅन्ट-शर्टचे कापड, टॉवेल, लहान मुलांचे कपडे, बेडशीट आणि ब्लँकेट यांचेही संकलन करण्यात येणार आहे.

शेतकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी पेन, पेन्सिल, कंपास पेटी, रंगपेटी आणि वह्या यांसारखे शालेय साहित्यही स्वीकारले जाणार आहे. नागरिकांना या उपक्रमात प्रत्यक्ष सहभागी होऊन श्रमदान करण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आर्थिक मदत करण्यासाठी :
सानिध्य फाऊंडेशन
खाते क्रमांक : ५०१००९०३२४३५४९
आयएफएससी क्रमांक :
एचडीएफसी०००९४५३

आर्थिक मदतीसाठी क्यूआर संकेतचित्राद्वारेही योगदान देता येणार आहे. प्रत्येक आर्थिक योगदानाची पावती देण्यात येणार असून, संस्थेच्या माहितीनुसार ८० जी अंतर्गत करसवलतीचा लाभ घेता येणार आहे.

संकलन केंद्रे :

१) बेलसर, पुरंदर — प्रतिमा जगताप, स्वामी बालसिद्धनाथ मंदिराजवळ, बेलसर, पुरंदर, पुणे. संपर्क : ७३८५९५३२३२
२) बालेवाडी, पुणे — अदिती जगताप, अवॉन व्हिस्टा, पाटील नगर, बालेवाडी, पुणे. संपर्क : ९९२१०३२०३२
३) औंध गाव, पुणे — सुदर्शन जगताप, सी/ओ पोपट जगताप, गायकवाड चाळ, लक्ष्मी पॅलेसजवळ, औंध गाव, पुणे. संपर्क : ९९६०३०३९५९
४) जुन्नर — ऋषी साबळे. संपर्क : ९१७२६६९४४९
५) सासवड, पुरंदर — शिवम टिळेकर, व्यंकटेश स्वप्ननगरी, सदनिका क्र. सी-२, सोनरी रस्ता, सासवड. संपर्क : ७४४७२२२३२४
६) कात्रज, पुणे — शिवम टिळेकर, जगताप असोसिएट्स, गुजरवाडी, कात्रज, पुणे. संपर्क : ७४४७२२२३२४
७) सोलापूर — रामचंद्र वाघमारे, ८५, मदर इंडिया नगर, ७० फूट रस्ता, कुमठा नाका, सोलापूर. संपर्क : ९०९६४२६२४१
८) पिंपरी, पुणे — विजय शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनजवळ, शालिनी रेसिडेन्सी, पिंपरी गाव, पुणे. संपर्क : ९९२२३७४३७७
९) सासवड, पुरंदर — सोनाली देसाई, ३०२ बी, सोपान नगर, हडको, दत्त मंदिरजवळ, सासवड. संपर्क : ९८८१४१२२७७
१०) हडपसर, पुणे — तानाजी चोरघे, अकीशीया गार्डन ३, बंगला क्रमांक ४, मगरपट्टा सिटी, हडपसर, पुणे. संपर्क : ८६२२८८८८७०
११) वारजे, पुणे — शेखर जगताप, सदनिका क्र. १६, सर्वे नं. १३९/१ए, सूर्यनगर सोसायटी, वारजे माळवाडी, पुणे. संपर्क : ९८८१९६१८६०१

दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्यासाठी समाजातील नागरिकांनी या उपक्रमात आपल्या परीने योगदान द्यावे, असे आवाहन ‘सानिध्य फाऊंडेशन’च्या वतीने करण्यात आले आहे. एक छोटीशी मदत एखाद्या शेतकरी कुटुंबाच्या घरात दिवाळीचा प्रकाश घेऊन जाऊ शकते. अधिक माहितीसाठी सौ. प्रतिमा प्रकाश जगताप : ७३८५९५३२३२ येथे संपर्क साधावा.